



किसान शिक्षण प्रसारक मंडळ, उदगीर द्वारा संचलित –

**महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर**

नॅक प्रमाणन 'ब' दर्जा

# आयू

वार्षिकांक २०१८–१९




**संपादक**
प्राचार्य डॉ. वसंत बिरादार

---

**कार्यकारी संपादक**
डॉ. दुर्गादास चौधरी (उपप्राचार्य)
डॉ. अनिल मुंढे
डॉ. सतीश ससाणे

---

**संपादक मंडळ**
प्रा. परमेश्वर इंगळे (ग्रंथपाल)
विष्णूदास गुरनाळे (मुख्यलिपिक)
प्रा. सौ. अहिल्या फेदराम

---

**टीप :** या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

## विद्यार्थी संपादक

**मराठी विभाग**
नालबंद प्रतीक सोमनाथ

---

**हिंदी विभाग**
पागे अनिल नागनाथ

---

**संस्कृत विभाग**
कदम दामिनी रमाकांत

---

**इंग्रजी विभाग**
देवकत्ते अक्षता बालाजी

---

**समाजशास्त्र विभाग**
पेड सुमित्रा कोंडिबा

---

**अर्थशास्त्र विभाग**
ससाणे कैलास सुनील

---

अक्षर जुळवणी
**अब्दुल अतिख**

---

**मुखपृष्ठ**
**नयन बाराहाते**

---

**मुद्रक**
**सतीश कुलकर्णी**
मयूर प्रिंटर्स, कैलासनगर, नांदेड
mayur.ned@gmail.com




पुरेसे आर्थिक स्त्रोत नसताना विद्यार्थी केंद्रबिंदू मानून महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूरचा 'आसूड' हा वार्षिक अंक आपल्या हाती देताना आम्हाला मनस्वी आनंद होतोय. 'आसूड' चा हा अंक आम्ही 'ज्यांच्या हाती शून्य होते' या शीर्षकाखाली संपादित केलेला आहे. नेहमीच्या चाकोरीबद्ध असलेल्या मळवाटेवरुनच आत्तापर्यंत वार्षिक अंक प्रकाशित होत असलेले दिसून आलेले आहेत. म्हणून, या परंपरेला छेद देऊन संपादक मंडळ व विद्यार्थी एकत्र येऊन ज्यांना ज्यांना परिस्थितीचे चटके बसलेत, शिक्षणापासून वंचित राहावे लागले किंवा ज्यांना आपल्या भावी आयुष्यात काही करु शकू किंवा नाही किंवा करण्यासाठी कुठल्याही प्रकारचे बळ नव्हते, साथ नव्हती अशांनी आणि शिक्षण घेतलेल्यांनी गुणवत्ता संपादन केली. पण नोकरीची कसलीच हमी, शाश्वती नसल्यामुळे एखाद्या व्यवसायाकडे धंद्याकडे वळून तो यशस्वी केला आणि इतरांसमोर एक आदर्श साकारुन दिला आहे अशा अहमदपूर व अहमदपूर परिसरातील निवडक '२३ व्यावसायिक तीर्थकांच्या' महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी घेतलेल्या मुलाखती या वार्षिक अंकामध्ये दिलेल्या आहेत.

ज्या ज्या व्यावसायिकांच्या मुलाखती येथे घेण्यात आलेल्या आहेत. त्या – त्या व्यावसायिकांना व्यवसायाच्या प्रारंभी त्यांच्या डोळयासमोर काळाकुट्ट अंधार होता. या अंधारातही त्यांनी प्रकाश शोधण्यासाठी व्यवसायाच्या माध्यमातून उडी मारली. त्यावेळी त्यांच्या हातात शून्य होते. आज त्यांचा व्यवसाय प्रगतीचे शिखर गाठलेला आहे. शिकून नोकरी करण्यापेक्षा एखादे व्यावसायिक कौशल्य संपादित करुन व्यवसाय टाकल्यास आपली प्रगती कशी चौफेर होते याचे उत्तम उदाहरण म्हणजे यातील २३ व्यक्ती आहेत. हे आमच्या विद्यार्थ्यांनी या निमित्ताने प्रकाशात आणलेले आहे. 'ज्यांच्या हाती शून्य होते' च्या निमित्ताने आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मुलाखतीच्या निमित्ताने मुलाखतीचे तंत्र अवगत झाले. व्यवसायाचे स्वरुप समजून घेता आले. यातून त्यांना नवीन आशावाद, प्रेरणा आणि नाविण्याची दिशा शोध यांचे कसबही अंगिकारता आले. याबद्दल आम्ही ठाम आहेत. 'शिका आणि कमवा' हा मंत्र या निमित्ताने त्यांना नक्कीच डोळस बनवेल. पदवी मिळविल्यानंतर केवळ नोकरीच्या मागे न लागता व्यवसायातल्या नवनवीन संधी शोधून यशस्वी व्यावसायिक बनण्याचा संस्कार देण्यासाठी व निराशेच्या प्रवृत्तीवर आसूड ओढण्या साठी 'ज्यांच्या हाती शून्य होते' या 'आसूड' २०१८–१९ या शैक्षणिक वर्षाच्या निमित्ताने आम्ही हा अंक आपल्या हाती देत आहोत. या अंकामागील प्रेरणेचे स्त्रोत 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' या ध्येयाने प्रेरीत होउन स्थापन झालेल्या किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, सहसचिव व सर्व पदाधिकाऱ्यांचे प्रोत्साहन असल्यामुळे हा पूर्णत्वाला आला असून मयूर प्रिंटर्सचे संचालक व त्यांच्या सर्व कर्मचारी वृंदामुळे हा अंक सुबक व देखणा झाला आहे. सर्वांचे मन:पूर्वक आभार ! येथे थांबतो...

धन्यवाद...!

# अ । नु । क्र । म

**संपादकीय**

**मुलाखत :**

- **मोहिनी साडी सेंटर :** सत्यनारायण श्रीनिवास काळे / कु. कदम सुलोचना ज्ञानोबा
- **खान मोबाईल शॉपी अॅन्ड इलेक्ट्रॉनिक, इलेक्ट्रेशियन :** पठाण समद नबीसाब / कांबळे पूजा भाऊसाहेब
- **ग्रॅज्युएट खिचडी** : वसंत हिरामण लामतुरे/ प्रियंका जगदीश वाघमारे
- **हॉटेल साई प्रीतम :** अनिल महाजन / पूजा रमाकांत पांचाळ
- **सागर फूट वेअर :** संतोष वाघमारे / प्रतीक सोमनाथ नालबंद
- **मिथुन सायकल** : मोहमद नाजीम शेख / शिल्पा नवरंगे
- **गणेश डिजीटल सेंटर** : गजानन बालाजी गंगथडे / मेघा सुरवसे
- **सचिन किराणा स्टोअर्स :** नारायण गुंडाप्पा काळे / संध्या गायकवाड
- **ओम मेडिकल :** ज्ञानेश्वर शिवाजीराव क्षीरसागर / प्रगती पांचाळ, वर्षा जोशी
- **चहावाला :** रवी श्रीराम गायकवाड / संतोष सोनकांबळे, नीलेश रोडे, सुरज पवार
- **भंगार विक्रेता :** सय्यद घूडन शफियोद्दीन / शिल्पा नवरंगे
- **बॉक्स - खपट विक्रेता :** रामप्रसाद चौकीलाल कश्यप / प्रियंका अ. सोनकांबळे
- **सुपर टेलर** :दगडे भीमराव मारोती बेलगावकर / अंजली बनसोडे
- **बालरोग तज्ज्ञ :** डॉ. सतीशचंद्र पंडितराव पेड पाटील / एकनाथ वाघमारे
- **परमेश्वर जनरल स्टोअर्स** : बसवेश्वर देविदास गंगापुरे / एकनाथ वाघमारे, कैलास ससाणे
- **मारोती स्वीट मार्ट** : दामोदर पटेल / कैलास ससाणे
- **पेंटर बालेश :** बालाजी धोंडिबा कानगुले / शुभम गुंजरगे, निलेश रोडे, मंगेश गवळी
- **पू. अहिल्याबाई होळकर :** महिला बचत गट / प्रणिता कावळे
- **भाजीपाला व्यावसायिक :** पार्वती माधव कांगणे /पल्लवी पाटील, ज्योत्सना काचोळे
- **द्वारकादास श्यामकुमार** : तुकाराम दशरथ पाटील /अनिल पागे
- **अमरदीप शिक्षण संस्था** : चौकटे महादेवी भीमराव / दामिनी कदम
- **औषधालय :** शरद किशन जोशी / विशाल गुंजरगे, मयुरी करनाळे
- **Rajmata Jijau Bahuuddeshiya Sanstha :** Mr. Dnynob Bhosale / Raut Lata

**प्राध्यापक सहभाग**

**सर्व विषयांचा व विभागाचा अहवाल :**

- **मराठी विभाग :** वार्षिक अहवाल २०१८–२०१९
- **हिंदी विभाग :** वार्षिक अहवाल २०१८–२०१९
- **इंग्रजी विभाग :** वार्षिक अहवाल २०१८–२०१९
- **संस्कृत विभाग :** वार्षिक अहवाल २०१८–२०१९
- **समाजशास्त्र विभाग :** वार्षिक अहवाल २०१८–२०१९
- **इतिहास विभाग :** वार्षिक अहवाल २०१८–२०१९
- **राज्यशास्त्र विभाग :** वार्षिक अहवाल २०१८–१९
- **अर्थशास्त्र विभाग :** अहवाल २०१८–१९
- **भूगोल विभाग :** वार्षिक अहवाल २०१८–२०१९
- **राष्ट्रीय सेवा योजना :** वार्षिक अहवाल सन २०१८–२०१९
- **Department of Library :** Annual Report (2018-19)
- **क्रीडा विभाग :** वार्षिक अहवाल २०१८–१९
- **गांधी विचार संस्कार परीक्षा :** वार्षिक अहवाल २०१८–२०१९
- **यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यास केंद्र**
  (**छ. शिवाजी महाराज अध्यासन केंद्र विभाग :** वार्षिक अहवाल २०१८–१९)
- **स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र :** वार्षिक अहवाल २०१८–२०१९
- **सांस्कृतिक विभाग :** वार्षिक अहवाल २०१८–२०१९



## मोहिनी साडी सेंटर

सत्यनारायण श्रीनिवास काळे

मुलाखत : **कु. कदम सुलोचना** (बी.ए. तृतीय वर्ष)

**नमस्कार, आपले पूर्ण नाव सांगा ?**

सत्यनारायण श्रीनिवास काळे

**आपल्या व्यवसायाची सुरवात कशी झाली ?**

हा व्यवसाय (कापडदुकान) माझ्या वडिलांकडून माझ्याकडे आला आहे. माझे वडील श्रीनिवासजी काळे यांनी अत्यंत कष्टातून शेत विकून पाच हजार रुपयाच्या भांडवलावर साधारणपणे १९५३ पासून आठवडी बाजारात वेगवेगळ्या गावी जावून कापड विक्रीचा व्यवसाय केला. यातूनच पुढे अहमदपूर मध्ये आमचे छोटे कापड दुकान सुरु झाले. आज त्याचा विस्तार मोठ्या वटवृक्षा सारखा झाला आहे.




**आपल्या वडिलांचे अहमदपूर शहराच्या विकासात प्राधान्याने नाव घेतले जाते.**

हो, अहमदपूरच्या विकासात माझे वडील अत्यंत पुढे होते. परंतु त्यानी व्यवसायातून, कमवलेली ही धनाची श्रीमंती अहमदपूरच्या सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, धार्मिक सुधारणेसाठी तसेच दीन दलित व श्रमिकांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी वापरली. त्यांनी बाबा आढाव, ना.य.डोळे, जनार्धन वाघमारे, नागोराव कुंभार यांच्या सोबत काम केले. महात्मा फुले शैक्षणिक संकुलाच्या उभारणीसाठी त्यांनी योगदान दिले आहे.

**व्यवसायातून किती कुटुंबियांना आधार दिला ?**

माझ्या वडिलापासून ते माझ्या पर्यंत अनेक कुटुंबियांच्या मुलांना व्यवसायाच्या माध्यमातून

रोजगार उपलब्ध करुन दिला. जवळपास दोन हजार कुटुंबियाना प्रत्यक्ष अप्रत्यक्ष आधार दिला.

**व्यवसायावर नोटबंदीचा परिणाम जाणवला का ?**

फार नाही; पण अल्पकाळात पुरेशा रोखतेची उपलब्धता होईपर्यंत व रोख विरहीत व्यवहारासाठी आवश्यक असलेल्या स्वाईप मशिन उपलब्ध होइपर्यंत कांही अंशी अडचण आली होती. परंतु अल्पकाळात या अडचणी दूर झाल्या.

**जी.एस.टी. बद्दल आपले मत काय आहे ?**

जी.एस.टी. हा व्यवसायिकांना सोयीचा असणारा तसेच अनेक कागदपत्रांच्या वेगवेगळ्या करातून मुक्ती देणारा कर म्हणून योग्य वाटतो.

**सामाजिक कार्यात आपला सहभाग ?**

लहानपणापासून आमच्या वडिलांच्या संस्कारामुळे सामाजिक कार्याची आवड आमच्यात निर्माण झाली. यातूनच पुढे सामाजिक प्रबोधनाच्या हेतूने वडिलांच्या स्मृती प्रित्यर्थ श्रीनिवास व्याख्यानमाला १९९० पासून सुरु आहे. महाराष्ट्रातील प्रसिद्ध समाजसुधारकांची व्याख्याने, त्यांचे कार्य व त्यांचे विचार अहमदपूर वासियांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न आम्ही या व्याख्यानमालेच्या माध्यमातून करत आहोत. यातून नरेंद्र दाभोळकर, अण्णा हजारे, किशोरजी व्यास, विवेक घळसासी इ. मान्यवरांचा समावेश होतो.

तसेच अनेक धार्मिक कार्यात तन–मन–धनाने सक्रिय सहभाग देत आहोत. तसेच वारकरी संप्रदायाचे ग्राम दैवत हनुमान मंदिराचा (अहमदपूर) जिर्णोद्धार करत लोकांच्या लोकवाट्यातून ६० लाख रुपये खर्च करुन आकर्षक व सुंदर मंदिर बांधले व पाण्याचा बोर मारत गोरगरीबांना पाणी दिले जाते.

**आम्हा विद्यार्थ्यांना आपण काय संदेश द्याल ?**

संकटावर मात करुन निराश व हताश न होता केवळ नोकरीच्या मागे न लागता स्वत:चा व्यवसाय स्थापन करुन स्वत:च्या पाऊलखुणा निर्माण करण्यात त्यासाठी यशस्वी उद्योजकांचे व्यावसायिकांचे जीवनचरित्र वाचले पाहिजे. त्यातून प्रेरणा घेऊन आपला मार्ग निवडला पाहिजे. स्वयं प्रकाशित व्हा, ध्येय प्रेरीत व्हा, हाच माझा तुम्हा विद्यार्थ्यांना संदेश आहे.

○○○



# खान मोबाईल शॉपी अ‍ॅन्ड इलेक्ट्रॉनिक्स, इलेक्ट्रेशियन

पठाण समद नबीसाब

मुलाखत : **कांबळे पूजा भाऊसाहेब** (बी.ए. प्रथम वर्ष)



**तुमचे पूर्ण नाव काय ?**

पठाण समद नबीसाब (खान मोबाईल शॉपी अ‍ॅन्ड इलेक्ट्रॉनिक्स, इलेक्ट्रेशियन)

**आपले शिक्षण**

बी.ए. एल. एल.बी. (एम.सी.व्ही.सी. इलेट्रॉनिक्स)

**या व्यवसायाकडे कसे वळलात व कधी सुरु केला ?**

एम.सी.व्ही.सी.त इलेक्ट्रॉनिक्स, इलेक्ट्रीकलचे शिक्षण घेतले होते. व त्यातूनच मोबाईल दुरुस्ती व्यवसायाकडे वळलो. महात्मा फुले महाविद्यालयाचा विद्यार्थी असल्याने कॉलेज संपल्यावर व्यवसाय करत होतो. हा व्यवसाय २०१०-११ मध्ये सुरु केला आज पूर्ण वेळ व्यवसायासाठी देतो.

**व्यवसायात सुरवातीचे भांडवल किती गुंतवले होते ?**

कौटुंबिक जबाबादारी असल्याने व शिक्षणाची आवड ही असल्याने कुटुंब चालवण्यासाठी शिक्षण घेत घेत इलेक्ट्रीकलची कामे करत होतो. त्यातून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत शिक्षणही घेत होतो शिक्षण घेताना स्वत:चा स्थायी व्यवसाय असावा म्हणून स्वकमाईचे एक हजार पाचशे रुपये सुरवातीस गुंतवले नंतर मित्रपरिवारांनी खूप सहकार्य केले. या छोट्या व्यवसायातून शिक्षण ही घेतले, कुटुंबाला स्थाई घर

दिले स्वत:चा चांगला संसार ही या व्यवसायातून मी करत आहे. खरोखरच कष्ट व जिद्द अनेक अडचणीवर मात करण्याची ताकद देते.

**नोटाबंदीचा काही परिणाम ?**

किरकोळ ग्राहक असण्याने व चिल्लर लवकर होत नसल्याने दुकानात ग्राहक जवळपास दोन महिने आलेच नाहीत. साधारण पणे दोन महिने हा प्रतिकुल परिणाम जाणवला. नंतर रोखविरहीत व्यवहाराचे वेगवेगळे ऍप आले यामुळे व्यवसायात गती आली.

**जी.एस.टी. बद्दल काय मत आहे ?**

हा एकच कर असल्याने कर भरण्यातील क्लिष्टता कमी झाली सुरळीतपणा आला. ग्राहकांचे समाधानही होत आहे.

**व्यवसायात येणाऱ्या अडचणी कोणत्या ?**

भांडवल कमी म्हणून गुंतवणूक कमी व्यवसाय वाढीवर मर्यादा होत्या आता काही अंशी त्या कमी होत आहेत. अडचणी तर अनेक आहेत त्यावर मात करुन व्यवसाय करत आहे.

**समाजकार्यात सहभाग**

समाजातील कुप्रथा, वाद कमी करण्यासाठी प्रयत्न करणे समाजातील कार्यात सक्रीय सहभाग घेत असतो.

**व्यवसायाबद्दलची अपेक्षा**

या छोट्या व्यवसायाची पुढे मॉलच्या स्वरुपात बदलण्याची इच्छा आहे. ज्यातून अनेकांना रोजगाराच्या संधी मी देऊ शकेल.

**विद्यार्थ्यांना संदेश**

आईवडिलांच्या कष्टांचे भान ठेवत शिक्षण घेताघेता छोट्या मोठ्या व्यावसायिक कला अवगत करण्यात व स्वत:चा आधार स्वत: निर्माण करावा – नोकरी सर्वांना मिळणार नाही म्हणून हताश न होता नोकरी पेक्षा अधिक उत्पन्न देणारा स्वतंत्र व्यवसाय महत्त्वाचा ठरतो.

○○○



## ग्रॅज्युएट खिचडी
वसंत हिरामण लामतुरे

मुलाखत : **प्रियंका जगदीश वाघमारे** (बी.ए. तृतीय वर्ष)



**तुमचे पूर्ण नाव काय ?**

माझे पूर्ण नाव वसंत हिरामण लामतुरे. मात्र या परिसरातील सर्व लोक 'देवा' या नावानेच ओळखतात.

**तुमचे शिक्षण किती झाले ?**

झाले नाही चालू आहे अजून. मी एम.ए. हिंदी आणि राज्यशास्त्र या विषयात पोस्ट ग्रॅज्युएट असून सध्या माझी पीएच.डी. हिंदी विषयात स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड येथे सुरु आहे.

**पोस्ट ग्रॅज्युएट असून, तुम्ही हा व्यवसाय का निवडला ?**

काय करणार ? पोटासाठी मला हा व्यवसाय करावा लागला. मी स्वाभिमानी माणूस आहे. शिक्षणाने मला स्वाभिमानाने जगायला बळ दिले. शिवाय विविध ठिकाणी मुलाखती देऊनही. मला नोकरी मिळाली नाही. कधी जात आडवी आली. कधी पैशामुळे मी मागे पडलो. पण माझे ब्रीदच आहे. 'नोकरी लागत नाही म्हणून काय झालं ? काम करतांना लाजायचं नसतं !'

**हा व्यवसाय कधी सुरु केला ?**

६ ऑक्टोबर २०१२ हा दिवस मला अजूनही आठवतोय. त्या दिवशी फक्त ५ किलो तांदळाची खिचडी शिजवली तोच माझा पहिला दिवस. त्या

आधी मी भरपूर कामं केली पण खिचडीचा हा पहिला दिवस.

**भांडवल किती लागलं ?**

सुरुवातीला मी माझ्या भाच्या कडून, प्रवीण कडून रु. ३०००/– उसने घेतले. सुरवातीला फक्त तांदूळ आणि मसाला, भाजीपाला विकत घेतला. लागणारे भांडे – कुंडे सर्व साहित्य हे भाड्याने तात्पुरते घेतले.

**बँकचे कर्ज काढले का ?**

नाही मला कोणत्याही बँकेने कर्ज दिले नाही. फक्त मी नवी मुद्रा योजना या योजनेतून मला ५०,००० रुपये कर्ज मिळाले. त्याचा मला खूप उपयोग झाला.

**अडचणी काय आल्या ?**

खूप अडचणी आल्या. अचूनही अतिक्रमणाच्या नावाखाली नगर परिषदेकडून, पोलीसांकडून त्रास दिला जातो.

**किती वेळ काम करता ?**

पहाटे चार वाजल्यापासून ते रात्री १० वाजे पर्यंत.

**खिचडीचे काय विशेष आहे ?**

आमची खिचडी ही गरीबांना परवडणारी आहे. १० रु. प्लेट ज्यात पापड, लिंबू, कांदा असतो. शिवाय थंड बिसलेरी पाणी आम्ही ग्राहकांना मोफत पुरवतो.

**कुटुंबाचे सहकार्य आहे का ?**

अर्थातच माझा मोठा भाऊ किशोर हा शिकत आहे. तो लेखक, कलावंत, नाट्यलेखक आहे. त्याचे मला मार्गदर्शन असते. माझी पत्नी स्वतः डी.एड. आहे. माझे भाचे उच्च विद्याविभुषित आहेत. हे सगळे मला माझ्या व्यवसायाला सतत मदत करतात.

**पुढे काय करणार ?**

व्यवसाय वाढविणार. सध्या आमच्या तीन शाखा आहेत. शिवाय पिठाची गिरणी, लाकडाची वखार हा आमचा साईड बिझनेस आहे. अजून मला स्वच्छ, शुद्ध पाण्याचा व्यवसाय करायचा आहे. खिचडी सेंटरला डायनिंग हॉल मध्ये रुपांतरित करायचे आहे. ग्रॅज्युएट खिचडीला पेटंट मिळवायचे आहे. खूप काही करायचे आहे.

**विद्यार्थ्यांना काय सांगाल ?**

आई वडिलांच्या पैशावर शिक्षण घेऊ नका. स्वत:ची कमाई योग्य वयात सुरु करा. कमवा आणि शिका. धन्यवाद

ooo



## हॉटेल साई प्रीतम

अनिल महाजन

मुलाखत : **पूजा रमाकांत पांचाळ** ( बी.ए. द्वितीय वर्ष)



**तुमचे पूर्ण नाव काय ?**

अनिल बाबुराव महाजन

**शिक्षण किती झाले ?**

दहावी पास झालो आणि पुढील शिक्षण बंद करुन हॉटेल व्यवसाय सुरु केला.

**हाच व्यवसाय का निवडला ?**

पोटापाण्यासाठी काही तरी कराव लागतं.

**कुटुंबाचा पाठींबा होता का ?**

हो. हे एकट्या दुकट्या माणसाचे काम नाही. आम्ही चारही भावांनी या धंद्यात आपले सर्वस्व पणाला लावले आहे.

**भांडवल कसे उभे केले ?**

एकदम बिकट परिस्थितीतून हा व्यवसाय उभा केला. सुरुवातीला खासगी सावकाराकडून व्याजाने पैसे

काढले. नंतर काही मित्रांनीही आर्थिक मदत केली.

**सुरुवातीला धंद्याचे स्वरुप कसे होते ?**

फक्त एक किलो पोह्यांवर आम्ही सुरुवात केली.

**सध्या दररोज किती पोहे लागतात ?**

आता धंदा एवढा जोरात आहे की ४० ते ५० किलो पोहे दररोज लागतात.

**गिऱ्हाईक वर्ग कोणता ?**

आमचे हॉटेल नांदेड लातूर रस्त्यावर असल्याने लातूर, नांदेड, परभणीला जाणारे येणारे प्रवासी हमखास येथे उतरुन पोह्याचा आस्वाद घेतात.

**कोण कोणते पदार्थ भेटतात ?**

आमच्याकडे स्पेशल पोहे, दही पोहे तर आमचे खास ब्रँड आहे. त्या शिवाय पेढा, बासुंदी आणि साबुवडा हे खास चालणारी पदार्थ आहेत.

**या व्यवसायाचे प्रशिक्षण घेतले का ?**

नाही. अनुभवातूनच शिकलो.

**जीएसटीचा परिणाम झाला का ?**

हो

**व्यवसायाच्या प्रगतीवर समाधानी आहात का ?**

हो. सध्या आम्ही इतर सहा लोकांना रोजगार उपलब्ध करुन दिला आहे. लोक नाव घेतात, हेच आमचे समाधान.

**सामाजिक कार्यात भाग घेता का ?**

हो, दरवर्षी पायी दिंडीत सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांना मोफत चहा, पोहे देत असतो.

**गिऱ्हाईकांना आकर्षित करण्यासाठी काय करता ?**

चांगली क्वालिटी देतो. शिवाय पिण्याचे शुद्ध व जारचे थंड पाणी देतो.

**व्यवसायासाठी किती वेळ देता ?**

दररोज १८ तास.

**नफा किती मिळतो ?**

भांडवलाच्या १०% नफा मिळतो.

**कॅरीबॅग वापरता का ?**

नाही. कॅरीबॅग किंवा प्लॅस्टीकचा वापर अजिबात नाही.

**विद्यार्थ्यांना काय संदेश द्याल ?**

शिक्षणाबरोबरच आवडीच्या उद्योगाचेही प्रशिक्षण घ्या. स्वाभिमानाने व सन्मानाने ताठ मानेने जगा.

○○○



## सागर फूट वेअर
संतोष वाघमारे

मुलाखत : **प्रतीक सोमनाथ नालबंद** (बी.ए. तृतीय वर्ष)




**तुमचे नाव काय ?**
माझे नाव संतोष तुळशीराम वाघमारे

**तुमचे शिक्षण किती झाले ?**
माझे शिक्षण दहावीपर्यंत झाले

**दहावी पास का नापास ?**
नापास

**पुढचे शिक्षण का घेतले नाही ?**
परिस्थिती नव्हती शिकण्यासारखी आणि मला आवडही नव्हती पुढे शिकण्याची.

**या व्यवसायात कसे आलात ?**

चप्पल बुट शिवणे, तयार करणे, बूट पॉलिश करणे हा आमचा पारंपरिक धंदा. वडीलही हाच

व्यवसाय करायचे. लहान पणापासूनच या कामाचा अनुभव होताच. दहावी नापास झाल्यावर मी पुढील शिक्षण बंद केले आणि या व्यवसायात पूर्णपणे स्वत: ला झोकून दिले.

**या व्यवसायात तुम्हाला कोणकोणत्या अडचणी आल्या ?**

तशा कोणत्याच अडचणी आल्या नाहीत कारण हा आमचा परंपरागत व्यवसाय आहे.

**भांडवल कसे उभे केले ?**

एकदा पूर्णपणे उतरल्यावर मी स्वत:पूर्ण वेळ देऊन काम करु लागलो. चप्पल - बूट चांगले दिल्यामुळे गिऱ्हाईक वाढू लागले. त्यामुळे वरचेवर हातात पैसा खेळू लागला.

**शासनाकडून काही मदत मिळाली का ? कर्ज वगैरे ?**

नाही. शासनाकडे पदर पसरत जायची मला गरजच भासली नाही. मी आतापर्यंत कोणतीही योजना घेतली नाही. तसेच कोणत्याही बँकेकडून कर्ज घेतले नाही.

**नोटाबंदीच्या काळात अडचणी आल्या का ?**

नाही. आमचा छोटा मोठा धंदा. त्यामुळे जास्त पैसा शिल्लक नव्हताच. माल विकला की लगेच नवा घेऊन यायचो. त्यामुळे जुन्या नोटा फारशा नव्हत्याच.

**जीएसटीचा काही परिणाम झाला का ?**

हो, जीएसटी मुळे बोगस कंपन्यांना आळा बसला.

**या व्यवसायात समाधानी आहात का ?**

हो, हा माझा आवडीचा व्यवसाय. लहान पणापासून पाहिलेला. वडील तेच करायचे. मोठे दोन्ही भाऊही याच व्यवसायात आहेत. आज या धंद्यात मी सुखी आहे. मी कुणाची नोकरी करीत नाही. उलट मी दोन युवकांना माझ्या दुकानावर रोजगार उपलब्ध करुन दिला आहे.

**व्यवसायाबरोबच सामाजिक कार्यात भाग घेता का ?**

हो. दरवर्षी संत रोहिदास महाराज यांचा जयंती महोत्सव आम्ही साजरा करतो. त्यानिमित्त मिरवणूक, अन्नदान अशा उपक्रमात सहभागी होतो.

**या यशाचे गमक काय ?**

काही नाही. गिऱ्हाईकांना गोड बोलावे लागते. चप्पल बूट कसे चांगले आणि स्वस्त आहेत, ते पटवून द्यावे लागते. त्यांची मर्जी राखावी लागते.

**युवकांना संदेश काय द्याल ?**

नोकरीच्या मागे न लागता, स्वतः उद्योग करा. मालक बना. नोकर बनण्यापेक्षा दुसऱ्यांना नोकरी द्या. स्वत:च्या पायावर उभे राहण्यातच जीवनाचा खरा आनंद आहे.

धन्यवाद

○○○



## मिथुन सायकल

मोहमद नाजी शेख

मुलाखत : **कु. शिल्पा नवरंगे** ( बी.ए. तृतीय वर्ष)

**शिक्षा**

दसवीं में असफल

पिताजी ने सन्, १९८४ में यह व्यवसाय शुरु किया था। उस समय एक छोटा– सा ठेला उसमें सायकल मरम्मत के लिए, पम्चर निकालने के लिए आवश्यक साहित्य था। उसमें चार पाँच खोल फिटिंग के लिए पाने थे और ट्यूब में हवा भरने के लिए एक पम्प था।



**यह व्यवसाय शुरु करते समय कौन – कौन सी समस्याएँ आ गयी ?**

समस्या तो बहुत सारी थीं परंतु समस्याओं के साथ लढना पिताजी ने सिखाया और हर किसी को मुसिबत में उनका साथ देना भी सिखाया था। अहमदपुर में दूर –दराज से बच्चे पढ़ने के लिए आते है। तो हम गरिब बच्चों और बच्चियों की सायकिल में मुप्त में हवा भरने का काम शुरु से करते आ रहे हैं। यह एक हम सामाजिक दायित्व ही मानते है।

**व्यवसाय शुरु करते समय अपने हसमें कितने रुपये लगाये थे ?**

पैसे तो नहीं थे बल्कि चार– पाँच पाने और एक हवा भरने का पम्प था इसीके ऊपर ही हमारी जीविका चलती थी।

**कितने बेरोजगारों को आपने रोजगार दिलाया ?**

शुरुवात में अकेला काम करता था। अब चार लोग मेरे साथ काम करते हैं और इसी दुकान के बलबुते

पर बच्चों को पढ़ाया और वे अब नोकरी करते हैं।

**सरकार की किसी योजना का लाभ अपने लिया है क्या ?**

मैंने सरकार की किसी भी योजना का लाभ नहीं लिया। बल्कि सामाजिक दायित्व समझकर लडकों की सायकल में मुफ्त में हवा भरने का काम करता हूँ। उनकी दुआ से ही सब कुछ ठीक है ऐसा मानता हूँ। मेरा एक बच्चा B.C.A. कर रहा है।

**आप मिथुन चक्रवर्ती के बहुत बड़े चाहते हैं एसा सुना है ?**

हाँ, ... इस कारण तो मैंने मिथुन फॅन क्लब शुरु किया और हर साल उनका जन्मदिन मनाता हूँ।

मेरा यह सामाजिक कार्य देखकर अपने अहमदपुर के पूर्व विधायक मा. बाबासाहेब पाटील साहब ने खुश होकर मुझे पचास हजार रुपये की सायकल में हवा भरने की मशीन भेंट दी और आजकल तो मैं अहमदपुर में पढाई करने वाली हर दिन एक हजार लड़यकियों की सायकलमें मुफ्त में हवा भरवाता हूँ... यह काम करते समय मुझे बहुत सकुन मिलता है।

**आप नये साल का स्वागत कैसे करते है ?**

मैं मिथुन फॅन क्लब के माध्यम से नये साल का स्वागत लोगों को दुध बाँटकर करता हूँ ताकि युवाओं को प्रोत्साहन मिले और नशा से दूर रहकर उनका स्वास्थ ठीक रहे। इस कारण मैं हर साल यह कार्य करता हूँ।

**आप युवाओं को क्या संदेश देना चाहते हैं ?**

युवाओं ने शिक्षा तो लेनी आवश्यक है साथ ही अपने माता पिता के ऊपर निर्भर न रहकर व्यवसाय करना चाहिए। ताकि स्वावलंबी बन जाए। व्यवसाय कौन–सा भी क्यों न हो शर्माना नही चाहिए। साथ ही हम समाज के घटक हैं तो सामामजिक दायित्व को निभाना भी हमारा कर्तव्य है। राष्ट्र हित, राष्ट्र की संपत्ति का जतन करना चाहिए। और कोई आपको मुफ्त देता है तो वह लेना नही चाहिए। यदि एक बार हमें मुफ्त में कुछ लेने की आदत पड़ गयी तो हम स्वावलंबी नही बनेंगे बल्कि परावलम्बी बनेंगे।

मैं जब मिथुनजी से मिला तो उन्होने मुझे कुछ चाहिए क्या! ऐसा पूछा तो मैंने उन्हें कहा कि आपसे मैं प्रत्यक्ष मिल सका यही मेरे लिए सबकुछ है। तो वे बहुत खुश हो गये।

धन्यवाद ! मोहमद साहब आपका जीवन एक खुली किताब है, जो आपसे मिलेगा वह निश्चित एक अच्छा भारत का इन्सान बनेगा। आपने हमें आपका किमती समय दिया इसके कारण पुनः एक बार आपके प्रति धन्यवाद! और आपको भविष्य के लिए हार्दिक शुभकामनाएँ!

○○○



## गणेश डिजीटल सेंटर

गजानन बालाजी गंगथडे

मुलाखत : **कु. मेघा सुरवसे** (बी.ए. तृतीय वर्ष)



**आपले पूर्ण नाव, शिक्षण व पत्ता कोणता आहे ?**

गजानन बालाजी गंगथडे – शिक्षण – बी.कॉम गाव : हसरणी ता. अहमदपूर जि. लातूर.

**व्यवसायाची सुरुवात कशी झाली ? भांडवल कसे जमवले ?**

१९९७ ला दहावीला नापास झालो. लहानपणापासून चित्र काढण्याची आवड होती. वडील एस.टी.त वाहक होते. घरची गरीब परिस्थिती होती. व्यवसाय करावा म्हटलं तर पैसे नव्हते. बँकही लोन देत नव्हती. २००७ ला एका मित्राने त्याच्या प्लॉटला तारण ठेवून भांडवल उपलब्ध करुन दिले. यातून व्यवसाय सुरु झाला. हळूहळू पत निर्माण झाली. पुढे जिल्हा उद्योग केंद्राकडून दहा लाख रुपये मिळाले.

**तुमच्या या व्यवसायातून किती जणांना रोजगार दिलात ?**

माझ्या या व्यवसायात सहा व्यक्ती कायमस्वरुपी काम करतात. याशिवाय इतर बारा कामगार रोजंदारीवर कामाला येतात. जेंव्हा जेंव्हा मोठे काम मिळते त्यावेळी आणखी काही कामगार हंगामानुसार घ्यावे लागतात.

**हाच व्यवसाय करण्याची प्रेरणा कशी मिळाली ?**

२००७ – ०८ मध्ये मी बी.कॉम पास झालो. नंतर पुण्यामध्ये पुढील शिक्षण घ्यायला गेल्यानंतर तिथे माझा एक मित्र हाच व्यवसाय करत होता. त्याच्या संबंधाने मला या व्यवसायाची ओळख झाली व आपणही हा व्यवसाय करावा याची प्रेरणा मिळाली.

**तुमच्या व्यवसायातून सामाजिक कार्य करण्याची कोणती भूमिका वठवता ?**

मुळात हा व्यवसाय मी माझ्या आवडीने निवडला होता. यातून काही सामाजिक कार्य करावे अशा हेतूने मी शिवजयंती उत्सवाच्या कामाचे पंधरा हजार रुपये कमी घेतले. तसेच दरवर्षी दसरा महोत्सवातही सामाजिक कार्य केले जाते. तसेच राष्ट्रमाता जिजाऊ – सावित्रीबाई फुले व्याख्यानमालेत तन – मन धनाने वाटा उचलून दरवर्षी सक्रीय सहभाग घेतला जातो.

**व्यवसायाबद्दल तुमची भूमिका काय आहे ?**

जिल्हा उद्योग केंद्राची फाईल पूर्ण झाल्यानंतर कमी व्याज दराचे मुद्रा लोन घेतले आणि व्यवसायाची सुरुवात केली. अतिशय आवडीने कामाला सुरुवात केली. प्रत्येकामध्ये कामाची आवड निर्माण झाली पाहिजे. कामात क्वॉलिटी ठेवली पाहिजे. प्रामाणिकपणा ठेवला पाहिजे. व्यवसायात पराकाष्टा असली पाहिजे. जिद्द ठेवून सातत्यपूर्वक मेहनत करुन लोकांना नव्या गोष्टी दिल्या पाहिजे.

**तुमच्या व्यवसायात कुटुंबातील सदस्यांचा हातभार लाभतो का ?**

डी.एड.साठी त्यावेळी दीड लाख रुपये लागत होते. त्यामुळे तिकडे जाऊ शकलो नाही. मी व माझ्याबंधुने हा व्यवसाय निवडला. आई गावची सरपंच आहे. पत्नीने PSI ची स्पर्धा परीक्षा दिली आहे. ग्राफीक्स आणि पेपर प्रिंटींग असे दोन व्यवसाय आहेत. कुटुंबातील सर्व सदस्यांचा हातभार मला या व्यवसायात लाभतो आहे.

**नवीन कार्य करण्याची इच्छा आहे का ?**

येणाऱ्या काळात या व्यवसायाबरोबरच त्याच्यातून नवीन उद्योग तयार करण्याचे प्रयत्न चालू आहेत. मोठमोठ्या महानगरात जाहिरात जगतात त्या नवनवीन गोष्टी आलेल्या आहेत. त्या इथे राबवायच्या आहेत.

**आजच्या शिक्षित बेरोजगारांना काय सांगाल ?**

नोकरीसाठी शिक्षण घेणे हे महत्त्वाचे नसून आपल्याला ज्या क्षेत्राची आवड आहे ते क्षेत्र तुम्ही निवडा. कोणताही व्यवसाय लहान मोठा नसतो. कोणताही व्यवसाय मन लावून आवडीने करावयाचा असतो. प्रत्येकाने आपली आवड व कौशल्ये लक्षात घेऊन व्यवसाय सुरु करावा. आपोआपच मार्ग सापडतात. परिस्थितीवर मात करावीच लागते.

**आपल्या दुकानचे नाव मार्केटमध्ये कसे आहे ?**

सुरुवात केली तेव्हा नाव नव्हते. पण पुढे कामाचा वेग व क्वॉलिटी पाहून लोकांत ओळख झाली. आज गणेश डिजीटल सेंटर ही ओळख सर्वदूर करण्यात यश प्राप्त झाले आहे.

**तुमच्या भावी कार्यास शुभेच्छा.**

धन्यवाद, आभारी आहे.

○○○



## सचिन किराणा स्टोअर्स

नारायण गुंडाप्पा काळे

मुलाखत : **संध्या गायकवाड** (बी.ए. तृतीय वर्ष)



**आपले नाव, पत्ता व शिक्षण याविषयी माहिती सांगा.**

नारायण गुंडाप्पा काळे, शिक्षण मॅट्रीक नापास, सचिन किराणा स्टोअर्स, मेन रोड, अहमदपूर.

**आपण पुढील शिक्षण का घेतले नाही ?**

मला पुढे शिकण्याची खूप इच्छा होती, पण घरची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्यामुळे शिक्षण घेता आले नाही. काम करत करत शिक्षण घेतले. तरीही अपूर्ण अभ्यासामुळे दोन विषय गेले. सुरुवातीला दुसऱ्याच्या दुकानात नोकर म्हणून काम केले. त्याचाही चांगला अनुभव आला.

**हाच व्यवसाय का निवडला ?**

दुसऱ्याच्या दुकानात राहण्यापेक्षा स्वत:चा व्यवसाय सुरु करावा या व्यवसायाचा अनुभव आल्यामुळे आपणही हाच व्यवसाय करावा असा मनातून विचार आला. त्यापूर्वीही मी कपडे शिवण्याचे काम केले. पुन्हा दुकानात काम करत करत टेलरिंगचेही काम सुरु ठेवले. कपडे शिवण्याची मशीन एका पाहुण्याची होती. चार हजार रुपये किरायाने आणली होती. पण किराणा व्यवसायातच अधिक मन रमले.

**किराण दुकानासाठी भांडवल कसे जमवले ?**

१९७५ साली किराणा दुकानाचा व्यवसाय सुरु केला. त्यावेळी स्वत:जवळ काही पैसेही नव्हते. बँकेला

विचारणा केली. पण बँक कर्ज देत नव्हती. मग खासगी सावकाराकडून व्याजाने पैसे घेतले आणि व्यवसाय सुरु केला. काटकसर करत येणाऱ्या नफ्यातून थोडे थोडे कर्ज फेडले. त्यानंतर येणाऱ्या नफ्यातून हळू हळू भांडवल जमा केले. आज हा व्यवसाय चांगला चालतो आहे.

**या व्यवसायाबरोबर सामाजिक कार्यात सहभाग घेता का ?**

सामाजिक कार्याची पूर्वीपासून मला खूप आवड आहे. कोणतेही सामाजिक काम असो, त्यात मी सक्रीय सहभाग घेऊन सर्वतोपरी सहकार्य करत असतो. गावामध्ये विविध धार्मिक, सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात पुढाकार घेतो. अखंड हरिनाम सप्ताहाच्या कार्यक्रमातून समाजजागृती घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले जातात.

**व्यवसाय करताना काही अडचणी आल्या का ?**

एकदा चोरट्यांनी दुकानात चोरी केली. त्यावेळी चोरट्यांनी खूप महत्त्वाच्या व जास्त किमतीच्या वस्तू चोरून नेल्या. पण हादरलो नाही. घाबरुन जायचे नाही हा निग्रह करुन २५०००/– रु. चे कर्ज घेऊन दुसरे सामान भरले.

**नवीन जी.एस.टी. करप्रणाली विषयी काय सांगाल ?**

जी.एस.टी. बद्दल बऱ्याच अडचणी असतात हे चर्चेतून ऐकल्याने आपले काय होणार ? असे वाटत होते. पण प्रत्यक्षात GST चा फायदाच झाला. व्यवहारात पारदर्शिपणा आला.

**नोटबंदीचा व्यवसायावर काय परिणाम जाणवला ?**

हो नोटबंदीचा व्यापारावर सहा महिने पेक्षा जास्त परिणाम जाणवला नाही. खरेदी – विक्रीत जास्त वाढ झाली नाही. पण पुढे व्यवहार सुरळीत सुरु झाला.

**तुम्ही इतरांना काय संदेश द्याल ?**

बऱ्याच तरुणांना वाटते की, नोकरी लागावी पण सर्वांनाच नोकरी शक्य नाही. मी विचार केला की, आपण नोकरीच्या मागे लागायचे नाही. तरी बिझनेस करायचा असे ठरवले होते. आपल्यापेक्षा लहान – मोठ्या व्यक्तीचा आदर्श घ्यायचा. पडेल ते काम करायचे त्यातूनच स्थिरता येते, आनंद मिळतो. नोकरीपेक्षा व्यवसायात जास्त आनंद आहे. व्यवसाय करत करत समाजसेवेत भाग घेतल्यास आणखी आनंद व समाधान प्राप्त होते हे मात्र खरे.

❍❍❍



## ओम मेडिकल
### ज्ञानेश्वर शिवाजीराव क्षीरसागर

मुलाखत : **प्रगती पांचाळ** (बी.ए. द्वितीय वर्ष)
**वर्षा जोशी** (बी.ए. द्वितीय वर्ष)




**नमस्कार, आपले पूर्ण नाव काय ?**
माझे पूर्ण नाव ज्ञानेश्वर शिवाजीराव क्षीरसागर होय.

**तुमचा जन्म कोठे झाला ?**
माझा जन्म मौजे धसवाडी ता. अहमदपूर येथे एका शेतकरी कुटुंबात झाला.

**तुमचे शिक्षण किती झाले ?**
१२वी विज्ञान पास झाल्यानंतर मी ठरवून औषधी शास्त्रात डी.फार्मसी ही पदविका पूर्ण केली. हे शिक्षण घेताना मला चंद्रसेन पाटील या मित्राची खूपच मदत झाली, त्यांनी केलेल्या आर्थिक सहाय्यामुळेच मी माझे शिक्षण पूर्ण करु शकलो.

**व्यवसाय का निवडला ?**
१२वी पासूनच मी औषध विक्री व्यवसायात उतरायचा निर्णय पक्का केला होता. मला दुसऱ्याची नोकरी न करता स्वत:च मालक बनायचे होते. म्हणून मी शिक्षण पूर्ण झाल्याबरोबर औषधी दुकान सुरु केले.

**व्यवसायाची सुरुवात कशी झाली ?**
अहमदपूर येथे या व्यवसायात भरपूर स्पर्धा होती. तरीही गाव जवळ असल्याने मी येथेच दुकान टाकायचे ठरवले. आणि आई – वडिलांच्या आशीर्वादाने ओम मेडिकल स्टोअर्सची सुरुवात केली.

**व्यवसायासाठी कर्ज घेतले का ?**
होय, मी फक्त रु. ५०००/– घेऊन अहमदपूर येथे आलो होतो. दुकान तर सुरु करायचे होते मित्रांनी ही माहिती आ. बाबासाहेब पाटील यांच्या कानावर घातली

त्यांनी मला मोलाची मदत केली. तसेच माझे जीवलग मित्र चंद्रसेन पाटील यांच्या आजोबांनी व्यवसायासाठी मला बिनव्याजी रु. १५०००/- दिले. त्यामुळेच मी हे धाडस करु शकलो.

**कुटुंबाचे सहकार्य होते का ?**

अर्थात माझे वडील आणि भावांनी मला स्वत:च्या नावावर बँकेचे कर्ज काढून देऊन खूपच मदत केली. त्यांचे कर्ज मी नंतर फेडले. आणि हो, विशेष म्हणजे रक्ताच्या नात्याबरोबरच मैत्रीचे नाते ही खूप महत्त्वाचे मानतो मी. माझे मित्र शिवदास सोलपुरे यांच्या वडिलांनीही मला व्यवसायात वेळोवेळी मदत केली आहे माणूसकीचे नाते मला खूप मोठे वाटते, ते यासाठीच.

**या व्यवसायात यश मिळाले का ?**

खूप मेहनत घेतल्यावर कोणत्याही व्यवसायात यश मिळतेच. मीही खूप मेहनत घेतल्यामुळे या व्यवसायात आज नाव कमावले आहे.

या व्यवसायामुळे मी घरच्या लोकांना मदत करु शकलो घरची पूर्ण जबाबदारी निभवू शकलो.

**व्यवसायासाठी दररोज किती वेळ देता ?**

आमचा व्यवसाय हा केवळ व्यवसाय नसून ती एक जनसेवा आहे. त्यामुळे रुग्णाला कधीही औषधाची गरज पडू शकते. म्हणून अठरा अठरा तास आम्ही सेवा देतो. एमर्जन्सी असेल तर कोणत्याही वेळी दुकान उघडावे लागते.

**तुम्ही इतरांना रोजगार देता का ?**

हो माझ्या दुकानात काम करण्यासाठी ५-६ मुले आहेत. त्यांना व्यवस्थित पगार दिला जातो.

**कॅसलेस व्यवहाराची सोय आहे का ?**

होय. नोट बंदी झाल्यापासून, लोकांना काही अडचण येऊ नये म्हणून आम्ही एटीएम कार्ड द्वारे व्यवहार सुरु केला आहे. स्वाईप मशिन, पेटीएम आदिचा वापर आम्ही करतो.

**ग्राहकांना योग्य सेवा कशी देता ?**

हे बघा, ग्राहक हा राजा आहे त्याला हवं ते दिलं पाहिजे. ज्या कंपनीची गोळ्या - औषधी त्यांना पाहिजेत. ते आम्ही कुठुनही उपलब्ध करुन देतो. शिवाय चोवीस तास सेवाही देतो. बी.पी. शुगरच्या पेशंटला महिनेवारी घरपोच गोळ्या उपलब्ध करुन देतो.

**सेवेत आनंदाचा क्षण ?**

खूपदा येतात. रुग्णांना हवे ते औषध उपलब्ध करुन देतो हाच आमचा सर्वात आनंदाचा क्षण.

**व्यवसायातील अडचणी ?**

ऑनलाईनच्या जमान्यात आता औषधीही घरपोच मिळू लागली आहेत. ते ताबडतोब बंद करावे अशी आमची मागणी आहे.

धन्यवाद

ooo



## चहावाला

रवी श्रीराम गायकवाड

मुलाखत :
**संतोष सोनकांबळे** (बी.ए. द्वितीय वर्ष)
**नीलेश रोडे** (बी.ए. द्वितीय वर्ष)
**सुरज पवार** (बी.ए. द्वितीय वर्ष)



**नमस्कार, आपले पूर्ण नाव काय ?**
नमस्कार, माझे पूर्णनाव रवी श्रीराम गायकवाड असे आहे.

**तुमचे मूळ गाव कोणते ?**
कंधार तालुक्यातील कळका हे माझे मूळ गाव आहे.

**तुमचे शिक्षण किती झाले ?**
कळका आणि कंधार येथेच माझे शिक्षण १०वी पर्यंत झाले आहे.

**हा व्यवसाय का निवडला ?**
माझे वडील आचारी होते. म्हणून मलाही हॉटेलची आवड निर्माण झाली म्हणून हा व्यवसाय मी निवडला.

**बँकेकडून कर्ज घेतले का ?**

हो या व्यवसायासाठी एका बँकेकडून ५०,०००/ – रुपये कर्ज घेतले होते.

**कुटुंबाचे सहकार्य मिळते ?**

हो, आम्ही तीन भाऊ आणि आमचे वडिल आम्ही सगळे या व्यवसायात आहोत. सर्वच जण काम करतात.

**व्यवसायातील अडचणी ?**

सुरुवातीला सार्वजनिक रस्त्यावर असल्याने आमचे चहाचे हॉटेल अतिक्रमणविरोधी पथकाने उठवले. हा त्रास बऱ्याच वेळा झाला. पण आता आम्ही व्यवस्थित सेटल झालो आहोत.

**तुमच्या चहाचे वैशिष्टय काय ?**

चहाला चांगली चव यावी म्हणून आम्ही चहापत्तीचे प्रमाण योग्य वापरतो. तसेच चांगल्या प्रतीची चहा पत्ती वापरतो. शिवाय चहा योग्य प्रमाणात ऊकळतो. विशेष म्हणजे आम्ही दुधात पाणी न टाकता त्या दुधाचा चहा करतो. शिवाय आम्ही पिशवीतले दूध न वापरता गाव–खेड्यातील ताजे दूधच वापरतो. त्यामुळे आमचा चहा लोकप्रिय आहे

**नफा योग्य मिळतो का ?**

हो ग्राहक मोठ्या संख्येने आमचा चहा पितात त्यामुळे हॉटेलवर सतत गर्दी असते. शिवाय दुकानदारांना आम्ही त्यांच्या मागणी प्रमाणे चहा पोहचवतो. त्यामुळे दिवसाकाठी चांगला नफा मिळतो.

**व्यवसायाला किती वेळ देता ?**

जास्त नाही आठ ते दहा तास वेळ देतो.

**तुमचे स्वप्न काय आहे ?**

पुण्यातील एका नामांकित चहा हॉटेलसारखे हॉटेल आपल्या अहमदपूर शहरात सुरु करणे हेच माझे स्वप्न आहे.

**विद्यार्थ्यांना संदेश ?**

आधी भरपूर शिका उच्च शिक्षण घ्या. पण नोकरी नाही लागली तर कामधंदा करायला लाजू नका.

धन्यवाद.

○○○



## भंगार विक्रेता

सय्यद घुडन शफियोद्दीन

मुलाखत : **शिल्पा नवरंगे** (बी.ए. तृतीय वर्ष)

**आपका नाम बताइए। आप अपने जीवन के बारे में क्या बताना चाहेंगे ?**

मेरा नाम सय्यद घूडन शाफियोद्दीन है। मैं सातवी फेल हूँ। फेल होने की वजह से पढ़ाई छोड़कर ईंट बनाने की फैक्ट्री में मजदूरी करने लगा। मेरे चार भाईयों में से मैं सबसे बड़ा होने की वजह से परिवार की जिम्मेदारी मुझ पर थी। अत: भंगार इकठ्ठा करना एवं उसे बेचने का काम भी मुझे करना पड़ा।



**आपको कितने बेटे हैं ?**

मुझे तीन बेटे हैं। एक बेटा वकील है। एक डॉक्टर है और एक नगरसेवक है। हमारा परिवार ३० सदस्यों का था। अर्थात संयुक्त परिवार था। हमारा बावजूद इसके सभी खुशी से रहते हैं।

**अपने व्यवसाय के बारे में आप क्या कहना चाहेंगे ?**

कोई भी काम छोटा या बड़ा नहीं होता । सिर्फ महेनत, लगन एवं ईमानदारीसे काम करना चाहिए तभी सफलता मिलेगी। सिर्फ शिक्षा प्राप्त करने से कुछ फायदा नहीं है। उसके साथ साथ जिद एवं मेहनत करने की तैयारी भी चाहिए। शुरु में मैंने बँक ऑफ महाराष्ट्र से २०,००० रु कर्जा लेकर मैने अपने छोटे से व्यवसाय की शुरुआत की थी। आज मेरे साथ-साथ मेरे बच्चों ने भी वैद्यकीय, सामजिक तथा शासकीय सेवा मे अच्छा नाम कमाया है।

**आप लोगों को क्या संदेश देना चाहेंगे ?**

छोटे से व्यवसाय से भी आदमी को कैसे बडा बनना है यह कोई मुझसे पूछे! मुझे देखे ! कोई कठिन बात नहीं है। मेहनत, ईमानदारी, सच्चाई के बलबूते पर हम आगे बढ़ सकते हैं।

ooo



# बॉक्स - खपट विक्रेता

## रामप्रसाद चौकीलाल कश्यप

मुलाखत : **प्रियंका अ. सोनकांबळे** (बी.ए. द्वितीय वर्ष)



**आपका पूरा नाम बताइए।**

मेरा नाम राम प्रसाद चौकीलाल कश्यप है।

**आप अपने जीवन के बारे में बताईए।**

सन १९८७ में रोजी - रोटी की तलाश में यहाँ अहमदपुर में आए। मुझे दो बेटे और एक बेटी है। बेटी की शादी हुई है। बड़ा बेटा बॉक्स - खपट इकठ्ठा करने में मदद करता है। दूसरा बेटा मंत्रालय में नौकरी करता है। आरोग्य विभाग में कार्यरत है। अब नांदेड में डेपोटेशन (प्रतिनियुक्ति) पर काम करता है।

**इस छोटे से व्यवसाय की समस्याओं के बारे में क्या कहेंगे ?**

शुरु में तो बहुत सारी अडचणें आयीं । पहले सिमेंट के थैले धोने का काम हम करते थे। दस-पंद्रह किलो मीटर गांवों में पैदल जाकर थैले इकठ्ठा कर उन्हें बेचते थे। फिर अहमदपुर में खाली बॉक्स (खपटें) इकठ्ठा करने लगे। अब यही हमारे लोगों का काम हो गया है। मेडिकल किराणा, कपडों के दुकान, जनरल स्टोअर्स से हम खपटें इकठ्ठा करते हैं।

**नोटबंदी का कुछ परिणाम हुआ ?**

नोटबंदी के कारण बिक्री में देरी हो रही थी। कुछ दिक्कतें जरुर आयी लेकिन अब ठीक है। हर महिने या पंद्रह दिन में कच्चा माल कंपनी को भेजते है। इसी से पैसे मिलते हैं। घर चलता है।

**लोगों को आप क्या संदेश देना चाहेंगे ?**

आज कल के बच्चों को व्यावसायिक ज्ञान होना अत्यंत आवश्यक है। जीवन में मेहनती, संयमी, ईमानदारी, जिद से कौनसा भी काम करेंगे तो उसमें आपको सफलता जरुर मिलेगी!

ooo

## सुपर टेलर

दगडे भीमराव मारोती (बेलगावकर)

मुलाखत : **अंजली बनसोडे** (बी.ए. द्वितीय वर्ष)



**आपले पूर्ण नाव काय ?**

दगडे भीमराव मारोती बेलगावकर.

**व्यवसाया विषयी काय माहिती सांगाल ?**

१९८२ मध्ये अहमदपूरला आलो. मी तृतीय व माझ्यापेक्षा दोन मोठे भाऊ आहेत. टेलरींगचा व्यवसाय करताना कसलाही पैसा नव्हता; पण व्याजी पैसे काढून हा व्यवसाय सुरु केला. या पूर्वी मुंबईला काम करण्यासाठी प्रयत्न केला; पण मुंबई जमली नाही. पुन्हा गावाकडे आलो. माझे मित्र कासले साहेब यांनी आम्हाला भाड्याने दुकान घेऊन दिले आणि या व्यवसायात त्यांनी आम्हाला प्रेरणा दिली आणि या व्यवसायाला बळ दिले.

**व्यवसायाचा प्रारंभ कसा झाला ?**

व्यवसाय सुरु केला पण हा व्यवसाय चालेल का ? नाही चालला तर दुकानचे भाडे फिटेल का ? आपणाला गावात तोंड दाखवण्यास जागा राहिल का ? मुंबईला परत जावे लागेल असे अनेक प्रश्न डोळ्यासमोर उभे राहिले. पण जिद्द, चिकाटी, मेहनत, सचोटी, प्रामाणिकपणा आणि व्यवसायातली गुणवत्ता, विश्वास संपादन करुन या व्यवसायात हळूहळू यशाची पायरी चढू लागलो.

**इतर कारागिरांना प्रशिक्षण देता का ?**

हा व्यवसाय केवळ आमचा कुटुंबाला यश देणाराच ठरला नाहीतर आमच्याकडून जवळपास पंचवीस कारागीर आज शिकून गेले. आमचे काम करुन गेले आणि आता चांगल्या पद्धतीने गंगाखेड परभणी, लातूर या सारख्या शहरात स्वत:च्या क्वालिटीचा ठसा उमटवून कार्य करत आहेत.

**नोटबंदीचा काय परिणाम झाला ?**

नोटबंदीचा या व्यवसायावर फार काही फरक पडला नाही.

**आजच्या फॅशनेबल युगात टेलरिंग व्यवसाय चालतो का ?**

टेलरींगमध्ये खूप स्पर्धा आली आहे. आजच्या युवा पिढीला रेडीमेड कपड्याचे आर्कषण आहे. परंतु आम्ही आमची क्वालिटी जपली आहे आणि अहमदपूर शहरात सफारी म्हटले की, सुपर टेलरचे नाव झालेले आहे.

**व्यवसायाविषयी समाधानी आहात का ?**

हो, आज या व्यवसायातून मी माझ्या मुलाला बी. कॉम. चे शिक्षण देत आहे.तोही सुट्टीमध्ये मदत करीत असतो. आज मार्केटमध्ये मानसन्मानाचे जीवन जगत आहोत. स्वत:चे घर झाले आहे.

**व्यवसाय व नोकरी या विषयी तुमचे मत काय ?**

स्वत:च्या व्यवसायात सातत्य असले तरी एक आत्मिक समाधान ज्ञानाबरोबरच व्यावसायिक ज्ञान सुद्‌धा असणे विद्यार्थ्यांसाठी तेवढेच महत्त्वाचे आहे. नोकरी मिळेलच याची खात्री नाही. कर्मचाऱ्यांनी ५२ दिवसांचा संप केला होता. बसून राहीले. अशाने राष्ट्राच्या प्रगतीला खीळ बसते प्रत्येकाने आपापले कर्तव्य पार पाडले पाहिजे.

○○○



## बालरोग तज्ज्ञ

डॉ. सतीशचंद्र पंडितराव पेड पाटील

मुलाखत : **एकनाथ वाघमारे** (बी.ए. तृतीय वर्ष)




**नमस्कार डॉक्टर साहेब ! तुमचे पूर्ण नाव सांगा ?**

नमस्कार माझे नाव डॉ. सतीशचंद्र पंडितराव पेड पाटील.

**तुमचे शिक्षण किती झाले ? कोणत्या पदव्या मिळविल्या ?**

माझे शिक्षण एम.बी.बी.एस. पूर्ण झाले आहे. आणि त्यात माझे बालरोग तज्ज्ञ हे विशेष शिक्षण झालेले आहे.

**वैद्यकीय सेवेतील आपले आदर्श कोण ?**

माझे वडील पंडितराव पेड पाटील हेच माझे आदर्श आहेत.

**तुमचे मूळ गाव कोणते ?**

अहमदपूर तालुक्यातील तीर्थ धानोरा हेच माझे मूळ गाव असून १ जून १९७९ रोजी तिथेच माझा जन्म झाला.

**अहमदपूर येथे व्यवसायास प्रारंभ कधी केला.**

वैद्यकीय शिक्षण पूर्ण झाल्यावर इ.स. २००८ मध्ये मी अहमदपूर येथेच वैद्यकीय सेवेला प्रारंभ केला. स्वत:चा दवाखाना सुरु केला.

**तुमच्या उपचारांचे विशेष काय ?**

ग्रामीण भागातील रुग्णांना परवडेल अशा माफक दरात वैद्यकीय सेवा देतो. लातूर – नांदेड परिसरातूनही माझ्याकडे विश्वासाने रुग्ण येतात, त्यांचाही विश्वास संपादन केला आहे.

**किती वेळ देता ?**

सुरुवातीला मी २४ तास सेवा देत असे. सर्व रुग्णांसाठी आता मात्र नवजात अर्भक किंवा काविळीच्या आजाराने ग्रस्त बालके ॲडमिट असतील तर २४ तास सेवा देतो. सामान्यपणे १० ते २ आणि ४ ते ६ अशी रुग्ण तपासणीची वेळ असते.

**इतर वेळेत काय करता ?**

बाकी दैनंदिन काम करतो. घरी आई – वडील, पत्नी, मुलांना वेळ देतो.

**समाजसेवेला वेळ देता का ?**

हो, मला लहानपणापासूनच समाजसेवेची आवड आहे. आजही मी रोटरी कलबच्या माध्यमातून समाजसेवा करतो. तीर्थ धानोरा हे गाव आम्ही कुपोषण मुक्त केले आहे. हे गाव रोटरी क्लबने दत्तक घेतले आहे. शिक्षण घेणाऱ्या मुलांना मोफत वैद्यकीय सेवा देतो.

**वैद्यकीय सेवेतील अनुभव सांगा ?**

हा व्यवसाय सेवा देणारा आहे. पण तितकाच संवेदनशील आहे. येणाऱ्या प्रत्येकाला वाटते इलाज व्हावा. त्यासाठी माझी खूप धडपड असते. पण जर का एखादा दुर्धर आजार लवकर बरा होत नसेल तर लोक नावे ठेवतात. अर्वाच्च बोलण्याचा प्रयत्न करतात. काही आजार खर्चिक असतात, तेव्हा अनुभव विचित्र येतात. पण आजार बरा झाला, बाळ ठणठणीत बरे झाले की, त्या माता पित्या प्रमाणे आम्हालाही आनंद होतो.

**लोकांना काय सांगाल ?**

कोणताही डॉक्टर आपला रुग्ण बरा व्हावा यासाठी प्रयत्न करतो. पण तोही शेवटी माणूस असतो. म्हणून डॉक्टरला ही समजून घेतले पाहिजे. विश्वास ठेवला पाहिजे.

धन्यवाद

○○○



## परमेश्वर जनरल स्टोअर्स

बसवेश्वर देवीदास गंगापुरे

मुलाखत : **एकनाथ वाघमारे** (बी.ए. तृतीय वर्ष)
**कैलास ससाणे** (बी.ए. तृतीय वर्ष)



**आपले नाव, शिक्षण याविषयी माहिती सांगा.**
बसवेश्वर देविदास गंगापुरे
परमेश्वर जनरल स्टोअर्स, थोडगा रोड, अहमदपूर.
शिक्षण – १२वी (१९९२) उत्तीर्ण

**व्यवसायाची सुरुवात केंव्हापासून केली ?**
माझ्या व्यवसायापूर्वी मी मामाच्या दुकानावर काम करत होतो. नंतर मी स्वत:चा व्यवसाय इ.स. २००० सालापासून सुरु केला.

**किती वर्षाचा अनुभव तुम्हाला आहे ?**
वयाच्या पंधराव्या वर्षापासून ते सध्या पर्यंत असा एकूण ३५ वर्षाचा अनुभव मला या कामी आहे. शिक्षण घेत घेत बाकी वेळेत मी मामाच्या दुकानात काम केले.

**दुकानासाठी भांडवलाची व्यवस्था कशी केली ?**
मुळात माझी परिस्थिती खूप हालाखिची होती. नोकरीची काही आशा नव्हती. स्वत:चा धंदा उभा

करण्यासाठी जवळ पैसे नव्हते. त्यावेळी प्रथम एक लाख रुपये कर्जाने घेतले त्यावर धंदा सुरु केला. अल्पावधीतच व्यवसाय जोमात आला. आज जवळपास चाळीस लाख रुपयाचे भांडवल दुकानात आहे.

**सामाजिक कार्यात सहभाग घेता का ?**

मला व माझ्या भावंडांना लहानपणापासून गरिबीचे चटके सोसावे लागले. शिक्षणासाठी खूप अडचणी यायच्या. याचे भान असल्यामुळे दुकानावर शैक्षणिक साहित्य घ्यायला येणाऱ्या गरिबांच्या विद्यार्थ्याला सूट देऊन, प्रसंगी उधारी, मोफत देऊन त्यांना हातभार लावला जातो.

**व्यवसायाविषयी आपले मत काय आहे ?**

कोणताही व्यावसाय जिद्दीने, मेहनतीने व चिकाटीने करावा. केवळ नोकरी म्हणून न बसता आपला आवडता व्यवसाय करावा.

| १ | बी.ए. प्रथम वर्ष | ०६ | ११ | १७ | २ | ४ | ० | २ | २ | २ | १ | ३ |
| २ | बी.ए. द्वितीय वर्ष | ०४ | ०७ | ११ | २ | ४ | १ | १ | १ | १ | – | १ |
| ३ | बी.ए. तृतीय वर्ष | ०० | १३ | १३ | ०० | ७ | – | ०० | ०० | ०२ | – | ०४ |

**डॉ. पी. बी. बिरादार**
संस्कृत विभाग

# समाजशास्त्र विभाग
# वार्षिक अहवाल २०१८-२०१९

किसान शिक्षण प्रसारक मंडळ उदगीर द्वारा संचलित महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूरची सुरुवात इ.स. २००० पासून झाली. महाविद्यालयाच्या स्थापनेपासून समाजशास्त्र विषयाची सुरुवात झाली. समाजशास्त्र हा विषय शिकण्याचा नसून जीवन जगायचा आहे. समाजात राहून सामाजिक बांधिलकी, सामाजिक एकात्मता, राष्ट्रीय एकात्मता, भाईचारा, नातेसंबंध इ. नैतिक मूल्यांची रुजवणूक करणारा विषय म्हणजे समाजशास्त्र होय.

इ.स. २०१८-२०१९ या शैक्षणिक वर्षाची सुरुवात जून महिन्यात प्रवेश प्रक्रियेने झाली. महाविद्यालयाचे सन्माननीय प्राचार्य साहेब डॉ. वसंत बिरादार पाटील यांच्या आदेशानुसार व नियोजित केलेल्या वेळापत्रकानुसार समाजशास्त्र विषयाच्या तासिका सुरु झाल्या. या विभागात समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. सतीश गंगाराम ससाने हे कार्यरत आहेत. तर त्यांच्या सोबत या शैक्षणिक वर्षात प्रा. फेदराम ए.ए. , मॅडम कार्यरत आहेत. समाजशास्त्र विभागात बी.ए. प्रथम वर्षात ६३ विद्यार्थी, बी.ए. द्वितीय वर्षात ३५ विद्यार्थी, व बी.ए. तृतीय वर्षात २६ विद्यार्थी संख्या आहे.

मा. प्राचार्य साहेबांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन केले जाते. या शैक्षणिक वर्षात समाजशास्त्र अभ्यास मंडळाच्या निर्मितीसाठी समाजशास्त्र विषयाच्या सर्व विद्यार्थ्यांना एकत्र करुन मिटींग घेवून समाजशास्त्र अभ्यास मंडळ व संपादक मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात निवड करण्यात आली. पदाधिकाऱ्यांची निवड खालील प्रमाणे करण्यात आली.

**समाजशास्त्र अभ्यास मंडळ**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अध्यक्ष | : | पेड सुमित्रा कोंडीबा<br>बी.ए. तृतीय वर्ष |
| २. | उपाध्यक्ष | : | पौळ श्रध्दा एकनाथ<br>बी.ए. तृतीय वर्ष |
| ३. | सचिव | : | गवळी मंगेश मारोती<br>बी.ए. तृतीय वर्ष |
| ४. | सहसचिव | : | गवळे रोहन संजय<br>बी.ए. तृतीय वर्ष |
| ५. | कोषाध्यक्ष | : | सय्यद सोहेल अन्वर<br>बी.ए. तृतीय वर्ष |
| ६. | सदस्य | : | विजय मुलमवाड<br>बी.ए. द्वितीय वर्ष |
| ७. | सदस्य | : | चव्हाण पूजा गोपीचंद<br>बी.ए. प्रथम वर्ष |
| ८. | सदस्य | : | राठोड दर्शना संतोष<br>बी.ए. प्रथम वर्ष |

संस्कार भित्तीपत्रक संपादक मंडळ

| | | | |
|---|---|---|---|
| १. | संपादक | : | कु. कदम दामिनी रमाकांत<br>बी.ए. तृतीय वर्ष |
| २. | सहसंपादक | : | कु. कदम सीता राजपाल<br>बी.ए. तृतीय वर्ष |
| ३. | रेखाटन | : | कु.शिवकन्या उध्दव तोटेवाड<br>बी.ए. तृतीय वर्ष |
| ४. | सजावट | : | चाटे धर्मराज बाबूराव<br>बी.ए. तृतीय वर्ष |

| | | |
|---|---|---|
| ५. मांडणी | : | कु. वाघमारे प्रियंका जगदीश<br>बी.ए. तृतीय वर्ष |
| ६. सदस्य | : | कु. बनसोडे अंजली विनायक<br>बी.ए. द्वितीय वर्ष |
| ७. सदस्य | : | सोनकांबळे संतोष वैजनाथ<br>बी.ए. द्वितीय वर्ष |
| ८. सदस्य | : | कु. कराड वैष्णवी आनंदराव<br>बी.ए. द्वितीय वर्ष |

दिनांक ०८/०८/२०१८ रोजी महाविद्यालयाच्या महात्मा फुले सभागृहात समाजशास्त्र अभ्यास मंडळ उदघाटन सोहळा व संस्कार भित्तीपत्रकाचे प्रकाशन कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून महात्मा फुले महाविद्यालय किनगाव येथील समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रा. बळीराम पवार हे उपस्थित होते. सर्व मान्यवरांच्या हस्ते अभ्यास मंडळ व संपादक मंडळाच्या पदाधिकाऱ्यांचे स्वागत करण्यात आले. व संस्कार या भित्तीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे व कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य साहेब यांनी विद्यार्थ्यांना अमूल्य असे मार्गदर्श्न केले. या शैक्षणिक वर्षात मा. प्राचार्य साहेबांच्या मार्गदर्शनाखाली बी.ए. तृतीय वर्षाच्या समाजशास्त्र विषयाच्या नवीन अभ्यासक्रमानुसार आधारीत एक दिवशीय समाजशास्त्र दिनांक २१ ऑगस्ट २०१८ रोजी सकाळी ठिक १० .०० वाजता कार्यशाळेचे उद्‌घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. विजयकुमार पाटील साहेब उपस्थित होते. तर कार्यक्रमाचे उदघाटक म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडचे मा. कुलगुरु डॉ. पंडित विद्यासागर साहेब उपस्थित होते. त्यांच्यासमवेत प्रमुख उपस्थितीत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार, डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन (मानव्य विद्याशाखा अधिष्ठाता)तसेच (समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष) डॉ. एन. टी. कांबळे हे उपस्थित होते तर समारोप प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव मा. डी. आर. झोडगे साहेब, प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.सुरेश वाघमारे (माजी प्राचार्य, संभाजी महाविद्यालय, मुरुड.) प्रमुख उपस्थितीत डॉ.वसंत भोसले,(व्यवस्थापन परिषद, सदस्य व वाणिज्य व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता) डॉ.दीपक बच्चेवार (व्यवस्थापन, परिषद सदस्य तथा) डॉ.महेश मगर, डॉ.एन.टी. कांबळे, व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.वसंत बिरादार उपस्थित होते. या कार्यशाळेला लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जिल्हयातील जवळपास १२० प्राध्यापकांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

या शैक्षणिक वर्षात जागतिक महिला दिनानिमित्त विविध क्षेत्रात (पोलिस, प्राध्यापिका, नगरसेविका, आदर्श शिक्षिका व सामाजिक कार्यकर्त्याचा माजी विद्यार्थ्याचा सत्कार करुन त्याचे अनुभव व अमुल्य मार्गदर्शन महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना दिले. मा. प्राचार्य साहेबांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम घेण्यात आला.

**समाजशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांची संख्या**

| अ.क्र. | वर्ग | मुले | मुली | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | बी.ए. प्रथम वर्ष | ३० | ३३ | ६३ |
| २ | बी.ए. द्वितीय वर्ष | १८ | १७ | २६ |
| ३ | बी.ए. तृतीय वर्ष | ०६ | २० | २६ |

समाजशास्त्र विभागाच्या वतीने वर्षभर अभ्यास

मंडळ व संपादक मंडळाच्या वतीने महापुरुषाच्या जयंत्या, स्मृतीदिन, व दिनविशेषानिमित्त 'संस्कार' भित्तीपत्रकाचे मा. प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली प्रकाशन करुन विद्यार्थ्यांमध्ये लेखन कौशल्याचे व साहित्य निर्मिती, वाचन संस्कृती, कौशल्ये विकसीत केली जातात.

**प्रा. डॉ. एस. जी. ससाणे**
समाजशास्त्र विभाग

# इतिहास विभाग
# वार्षिक अहवाल २०१८-२०१९

महाविद्यालयाच्या स्थापनेपासून इतिहास विषयाची सुरुवात झालेली आहे. या शैक्षणिक वर्षाची सुरुवात जून महिन्यात विद्यार्थी प्रवेश प्रकिया होवून पूर्ण झाली. प्रवेश प्रकिया पूर्ण झाल्यावर विद्यापीठाच्या आदेशानुसार व महाविद्यालयाच्या वेळापत्रकानुसार इतिहास विभागाच्या तासिका सुरु झाल्या. सध्या विभागात इतिहास विभागप्रमुख प्रा. डॉ. बब्रुवान मोरे व प्रा. डॉ. संतोष पाटील हे कार्यरत आहेत. इतिहास विभागात बी. ए. प्रथम वर्ष ६२ विद्यार्थी बी. ए. द्वितीय वर्ष ३२ विद्यार्थी, व बी. ए. तृतीय वर्ष ३९ विद्यार्थी संख्या आहे.

इतिहास विषयाच्या सर्व विद्यार्थ्यांची मिटींग घेवून इतिहास अभ्यास मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची व इतिहास विषयाच्या संस्कृती भित्तीपत्रकाच्या संपादक मंडळाची निवड करण्यात आली. ती पुढीलप्रमाणे आहे.

**इतिहास अभ्यास मंडळ**

१. अध्यक्ष : कु. फाजगे रोहिणी बाबूराव (B.A.T.Y)
२. उपाध्यक्ष : कु. मुसळे स्मिता वसंतराव (B.A.T.Y)
३. सचिव : कु. होळे नम्रता साहेबराव (B.A.S.Y)
४. सहसचिव : राठोड राहूल साहेबराव (B.A.F.Y)
५. कोषाध्यक्ष : कु. डुकरे पूजा घन:शाम (B.A.S.Y)
६. संघटक : पाटील रितेश शिवाजीराव (B.A.T.Y)
७. सदस्य : नायने गोविंद नागनाथ (B.A.F.Y)
कु. सोनकांबळे प्रियंका अशोक
कु. कदम सुलोचना ज्ञानोबा

‘संस्कृती’ भित्तीपत्रक संपादक मंडळ

१. संपादक : कु. जाधव प्रभावती अंकुश (B.A.T.Y)

२. कार्यकारी संपादक : पागे अनिल नागनाथ (B.A.T.Y)

३. सहसंपादक : कु. घुले कोमल गोविंद (B.A.F.Y)

४. रेखाटक : कु. देमगुंडे सोनल वैजनाथ (B.A.T.Y)

५. मांडणी : सूर्यवंशी मंगेश संग्राम (B.A.F.Y)

६. सजावट : शिंदे कुणाल बालाजी (B.A.F.Y)

७. सदस्य : कराड पवनकुमार बालाजी (B.A.F.Y)
कु. शिवदासे पल्लवी देवीदास (B.A.T.Y)

इतिहास विभागाच्या विविध कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन इतिहास अभ्यास मंडळाच्या सदस्यांनी व भित्तीपत्रकाच्या संपादक मंडळाने वर्षभर आनंदाने व उत्साहाने करण्यात आले.

**इतिहास अभ्यास मंडळ उद्‌घाटन व भित्तीपत्रक प्रकाशन कार्यक्रम**

दिनांक १६/०८/२०१८ रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांच्या अध्यक्षतेखाली प्रा. डॉ. चंदन बावलगावे इतिहास विभाग प्रमुख, संजीवनी महाविद्यालय चापोली यांच्या उपस्थितीत इतिहास अभ्यास मंडळाचे उद्‌घाटन करण्यात आले. पदाधिकारी व भित्तीपत्रकाचे संपादकीय मंडळ यांचा सत्कार मा. प्राचार्य व प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते झाला. या कार्यक्रमात पाहुण्यांनी ऐतिहासिक संदर्भ देत स्वातंत्र्य लढ्यांची माहिती दिली. विद्यार्थ्यांनी मनोगते मांडली इतिहास विषयाच्या प्राध्यापकांनी व प्राचार्यांनी समयोचित भाषणे केली.

**वर्षभर विविध भित्तीपत्रकाचे प्रकाशन**

इतिहास विभागाच्या ‘संस्कृती’ भित्तीपत्रक संपादक मंडळातर्फे वर्षभर विविध विषयावर एकूण सहा भित्तीपत्रकाचे प्रकाशन मा. प्राचार्याच्या हस्ते करण्यात आले. या भित्तीपत्रक प्रकाशनाच्या माध्यमातून ऐतिहासिक लेखांद्वारे प्रबोधन करण्याचे कार्य संपादक मंडळाने उत्तमरित्या केले.

**वर्ग निहाय विद्यार्थी संख्या**

| अ.क्र. | वर्ग | प्रवेशित | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | मुले | मुली | |
| १ | बी. ए. प्रथम वर्ष | ३१ | ३१ | ६२ |
| २ | बी. ए. द्वितीय वर्ष् | १५ | १७ | ३२ |
| ३ | बी. ए. तृतीय वर्ष | १२ | २७ | ३९ |

**छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्र - वार्षिक अहवाल २०१८-२०१९.**

महात्मा फुले महाविद्यालयात महाविद्यालयाचे प्राचार्य यांच्या कल्पकतेतून, किसान शिक्षण प्रसारक मंडळाच्या परवानगीने, छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्राची स्थापना दिनांक ०६/०२/२०१९ रोजी करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंतराव बिरादार पाटील यांच्या हस्ते रीतसर इतिहास विभागात या अध्यासन केंद्राचे उद्‌घाटन करण्यात आले.

छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्रातर्फे दिनांक १९/०२/२०१९ रोजी शिवजन्मोत्सव महात्मा फुले परिवारातर्फे साजरा करण्यात आला या शिवजन्मोत्सव कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान श्री दत्तुजी जाधव साहेब यांनी भूषविले. तर मा. श्री माधवराव

पाटील, माजी मंत्री मा. श्री बाळासाहेब जाधव, अहमदपूर व चाकूर मतदार संघाचे आमदार श्री. विनायकराव पाटील, मा. प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. भव्यदिव्य देखाव्याद्वारे अहमदपूर शहरात शिवजन्मोत्सवाची शोभायात्रा काढण्यात आली. महात्मा फुले महाविद्यालयाचा राष्ट्रीय एकात्मतेचा देखावा सर्वांचे लक्ष वेधून घेत होता.

छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंदातर्फे गरीब व होतकरु मुलांना मार्गदर्शन, स्पर्धा परिक्षेची तयारी, ऐतिहासिक सहली, यांचे आयोजन केले जाते. विद्यार्थ्यांना इतिहास विषयाबरोबरच महामानवाचा आदर्श समजवला जातो.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार यांच्या अभिनव कल्पनेतून छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्रातर्फे गरीब व होतकरु विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वाचनालय करण्यात आलेले आहे. या अध्यासन केंद्राला पुस्तके भेट देण्यासंदर्भात प्राचार्यांनी आवाहन केले. यानुसार डॉ. चेरेकर मधुसूधन यांनी ४१ ग्रंथ भेट दिले. तसेच संत गाडगे महाराज महाविद्यालय, लोहा येथील ग्रंथपाल प्रा. राजेश गोरे यांनी वीस हजार रुपयाचे ८६ ग्रंथ महाविद्यालयाच्या प्राचार्याकडे भेट स्वरुपात दिले. तसेच महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी, प्राध्यापकांनी व शिक्षकेत्तर कर्मचार्यांनी दिले. त्या ग्रंथ भेटीमुळे ग्रंथसंख्या ४०० झालेली आहे. ही ग्रंथ संख्या १५०० पर्यंत नेण्याचा मा. प्राचार्यांचा मानस आहे.

अशाप्रकारे छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्र स्वतंत्र वाचनालय चालवणारे स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ नांदेडमधील एकमेव अध्यासन केंद्र आहे.

**डॉ. बब्रुवान मोरे**
संचालक,
छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्र

# राज्यशास्त्र विभाग
# वार्षिक अहवाल २०१८-१९

किसान शिक्षण प्रसारक मंडळ, उदगीर द्वारा संचलित, महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर येथे स.न. २००० पासून राज्यशास्त्र या ऐच्छिक विषयाची सुरवात झाली. राज्यशास्त्र या विषयाने अगदी अल्पावधीतच भरारी घेतली आहे. राज्यशास्त्र या विभागाने गुणवत्तेसोबत व्यक्तिमत्व विकासाला पोषक वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला. सातत्याने या विभागाचे कामकाज चालू आहे.

या वर्षी बी.ए. प्रथम वर्षात राज्यशास्त्र हा ऐच्छिक विषय घेणारे ७९ विद्यार्थी, बी.ए. द्वितीय वर्षात ४१, बी.ए. तृतीय वर्षात ३३ विद्यार्थी आहेत. शैक्षणिक वर्षाची सुरवात झाल्यानंतर सुरवातीला सर्व वर्गातील विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले.

तसेच या शैक्षणिक वर्षाच्या सुरवातीस अभ्यास मंडळाची स्थापना करुन, अभ्यास मंडळाचे उद्घाटन प्रा. डॉ. एस. टी. शिंदे सर, लोकमान्य महाविद्यालय, सोनखेड यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी 'समता' या नावाच्या भित्तीपत्रकाचे विमोचन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे सन्माननीय प्राचार्य डॉ. वसंत बिरादार तसेच अभ्यास मंडळाचे अध्यक्ष पागे अनिल नागनाथराव व संपादक मंडळाचे मुख्य संपादक कु. मुसळे स्मिता, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. डी.डी. चौधरी हेही उपस्थित होते. भित्तीपत्रकाच्या संपादक मंडळात संपादक कु. मुसळे स्मिता, सहसंपादक सूर्यवंशी परमेश्वर, कार्यकारी संपादक कु. मलकापुरे रेणुका इ. विषयाचे विद्यार्थी कार्यक्रमास उपस्थित होते.

तसेच राज्यशास्त्र विभागामार्फत भित्तीपत्रकाच्या विविध विशेष अंकाचे प्रकाशन करण्यात आले. मतदार जागृती अभियान शहरात रॅली काढून राबविण्यात आले. याशिवाय अनेक कार्यक्रमाचे आयोजन केले गेले त्यात वादविवाद, गटचर्चा, गेस्ट लेक्चर इ. समावेश होता.

**डॉ. पी.पी. चौकटे**
राज्यशास्त्र विभाग

# अर्थशास्त्र विभाग
# अहवाल २०१८-१९

शैक्षणिक वर्ष २०००-२००१ पासून महाविद्यालयात अर्थशास्त्र विभाग कार्यरत आहे. विद्यार्थी केंद्रबिंदू मानून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेसोबत व्यवहारिक, ज्ञानात्मक, सर्वांगीन विकास घडावा या दृष्टीने अर्थशास्त्र विभाग 'फुले पॅटर्न' चा महत्त्वाचा भाग म्हणून यशस्वीपणे प्रयत्नरत राहिलेला आहे.

विद्यार्थ्यांना अर्थशास्त्राच्या सैद्धांतिक ज्ञानासोबतच, व्यवहारिक ज्ञान घेण्यासाठी, तसेच त्यांच्यातील सुप्त कौशल्ये विकसीत होण्याच्या उद्देशाने विविध प्रेरणात्मक कार्यक्रम यशस्वीपणे मा. प्राचार्य साहेबांच्या मार्गदर्शनातून राबवत आलेला आहे. त्याचाच एक भाग म्हणून शैक्षणिक वर्ष प्रारंभी प्रथम वर्ष प्रवेशीत नवविद्यार्थ्यांच्या स्वागताचा व अभ्यासमंडळ आणि संपादक मंडळ स्थापण करण्याचा कार्यक्रम बैठकीच्या द्वारे घेण्यात आला. यातूनच अभ्यास मंडळ स्थापना व भित्तीपत्रक 'अर्थस्पंदन' विमोचनाचा आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन कार्यक्रम दि. २५.८.२०१८ या दिवशी निश्चित करण्यात आला.

दि. २५.०८.२०१८रोजी आयोजीत 'अर्थशास्त्र अभ्यास मंडळ उदघाटन व 'अर्थस्पंदन' भित्तीपत्रक विमोचन कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय अर्थव्यवस्थेतील बदलते प्रवाह या विषयावर श्री व्ही.डी. गुरनाळे यांचे विद्यार्थ्यांना मौलिक मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार हे होते.

अर्थशास्त्र विभागाच्या 'अभ्यासमंडळ' व 'संपादक मंडळाने' या शैक्षणिक वर्षात विविध आर्थिक विषयावर एकूण सहा भित्तीपत्रके विमोचित केली. ज्यामध्ये लातूर जिल्हा विशेषांक, सहकार विशेषांक, महात्मा गांधी आर्थिक विचार विशेषांक, अर्थसंकल्पीय विशेषांक, बँकिंग नवकल्पना विशेषांक. या विषयानुषंगाणे भित्तीपत्रांचे विमोचन प्रत्येक महिण्यात प्रमुख पाहुणे व प्राचार्यसाहेबाच्या हस्ते करण्यात आले. या भित्तीपत्रकाद्वारे महाविद्यालयातील अर्थशास्त्र विषया शिवाय इतर सर्व विषयांच्या विद्यार्थ्यांना आर्थिक विचार व घडामोडीचे ज्ञान मिळाले. तसेच विद्यार्थ्यांच्या संशोधन व लेखन कलेला गती मिळाली.

विद्यार्थ्यांच्या ज्ञानकक्षा विस्तृत करण्याच्या उद्देशाने विभागाने वेळोवेळी गटचर्चा, सेमिनार, अंतर्गत परीक्षा हे विद्यार्थी केंद्रीत उपक्रम राबवले. वार्षिकांकाच्या उद्देशाने व व्यावहारिक माहिती व ज्ञान मिळावे म्हणून अहमदपूर शहरातील ज्यांनी कसलेही आर्थिक पाठबळ नसतांना स्वकष्टातून नोकरीच्या मागे न लागता स्वत:चा व्यवसाय सुरु केला. अशा शुन्यातून विश्व निर्माण करणाऱ्या यशस्वी व्यवसायिकांच्या मुलाखती साठी अर्थशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांनी घेण्यात दाखवलेला उत्साह महत्वाचा वाटतो. मा. प्राचार्यांच्या मार्गदर्शनातून अर्थशास्त्र विभागाच्या सहकार्याने विद्यार्थ्यांनी हा 'ज्यांच्या हाती शून्य होते.' हा राबवलेला उपक्रम कौतुकास्पद आहे.

अर्थशास्त्र विभागाची उत्कृष्ट निकालाची परंपरा यावर्षीही राहिलेली आहे. बी.ए. प्रथम, द्वितीय, तृतीय वर्षातील अर्थशास्त्र विषयाचे निकाल प्रशंसनीय आहेत.

अर्थशात्र विभाग

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ विद्यार्थी संख्या

**वर्ग निहाय संख्या**

| वर्ग | विद्यार्थिनी | विद्यार्थी | एकुण |
|---|---|---|---|
| बी.ए. प्रथम वर्ष | ३८ | २२ | ६० |
| बी.ए. द्वितीय वर्ष | १३ | १५ | २८ |
| बी.ए. तृतीय वर्ष | ११ | ५ | १६ |
| **एकूण** | **६२** | **४२** | **१०४** |

शैक्षणिक वर्ष २०१८-१९

**अर्थशास्त्र अभ्यासमंडळ**

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | : | राऊत लता - (बी.ए. तृतीय वर्ष) |
| उपाध्यक्ष | : | श्रीरामे ज्ञानेश्वरी - (बी.ए. द्वितीय वर्ष) |
| सचिव | : | वाघमारे एकनाथ - (बी.ए. तृतीय वर्ष) |
| सदस्य | : | कांबळे सुजाता - प्रथम वर्ष |
| | | लामतुरे वैभव - प्रथम वर्ष |
| | | पेड सुमित्रा - तृतीय वर्ष |
| | | व्हडगीर हनुमंत - प्रथम वर्ष |
| | | मकापल्ले राणी - प्रथम वर्ष |
| | | मुठाळ पूजा - प्रथम वर्ष |

**'अर्थस्पंदन' भित्तीपत्रक संपादक मंडळ**

| | | |
|---|---|---|
| संपादक | : | पांचाळ पूजा (द्वितीय वर्ष) |
| सहसंपादक | : | चाउस सुमैय्या (प्रथम वर्ष) |
| रेखाटक | : | ससाणे कैलास (तृतीय वर्ष) |
| सदस्य | : | सूर्यवंशी परमेश्वर (द्वितीय वर्ष) |
| | | चंदाले श्रद्धा (प्रथम वर्ष) |
| | | कासले अश्विनी (प्रथम वर्ष) |
| | | डुकरे पूजा (द्वितीय वर्ष) |
| | | नायने गोविंद (प्रथम वर्ष) |

**डॉ. डी.डी. चौधरी**

अर्थशास्त्र विभाग

# भूगोल विभाग
# वार्षिक अहवाल २०१८-२०१९

किसान शिक्षण प्रसारक मंडळ उदगीर द्वारा संचलित महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर येथे सन २००० पासून भूगोल या ऐच्छिक विषयाच्या अभ्यासाला सुरुवात झाली अल्पावधीतच हा विषय विद्यार्थीप्रिय झाला. भूगोल विभागात मी डॉ. दिगंबर माने व प्रा. सचिन गर्जे कार्यरत आहोत. गेल्या १८ वर्षात आमचे विभागाने अधिकाधिक गुणवंत विद्यार्थी घडवली आहेत. तसेच उपयोजित ज्ञानाची कास धरली आहे.

महाविद्यालयाच्या उज्ज्वल यशाच्या परंपरेत भूगोल विभागाच्या विद्यार्थ्यांचे योगदान नक्कीच अमूल्य आहे. भूगोल विषयाच्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठीय स्तरावर सर्वाधिक गुण घेऊन महाविद्यालयाचा नावलौकिक वाढवला आहे.

विद्यापीठाच्या सन २०१६-२०१७ च्या परीक्षेत भूगोल विषयात तानाजी संजय कांबळे यांनी विद्यापीठाचे 'सुवर्णपदक' पटकावले याचा महाविद्यालयाला सार्थ अभिमान आहे.

सन २०१८-२०१९ मध्ये बी.ए. प्रथम वर्षात २३, द्वितीय वर्षात २६ व तृतीय वर्षात ३३ विद्यार्थी भूगोल विषयाचे अध्ययन करत आहेत. शैक्षणिक वर्षाची सुरवात झाल्यानंतर भूगोल अभ्यास मंडळाची बैठक दिनांक २१/०७/२०१८ रोजी संपन्न झाली. लोकशाही पध्दतीने निवडणूक घेऊन भूगोल अभ्यास मंडळाची स्थापना करण्यात आली भूगोल अभ्यास मंडळाच्या अध्यक्षपदी नालबंद प्रतीक तर उपाध्यक्षपदी जाधव गणेश यांची निवड झाली.

दिनांक १८/०८/२०१८ रोजी भूगोल अभ्यास मंडळाचे उद्घाटन डॉ. परमेश्वर लोहकरे, तुळशीराम पवार महाविद्यालय हडोळती याच्या हस्ते करण्यात आले तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार सर होते. यावेळी प्राध्यापक

व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

भूगोल अभ्यास मंडळ

१. अध्यक्ष : नालबंद प्रतीक (B.A.T.Y.)

२. उपाध्यक्ष : जाधव गणेश (B.A.T.Y.)

३. सचिव : कांबळे दिनेश (B.A.S.Y.)

४. सहसचिव : पौळ श्रध्दा (B.A.T.Y.)

५. कोषाध्यक्ष : कराड पवन (B.A.F.Y.)

६. सदस्य : सोनकांबळे संतोष (B.A.S.Y.)

भूगोल संपादक मंडळ

१. संपादक : ससाणे कैलास (B.A.T.Y.)

२. सहसंपादक : शिवदासे पल्लवी (B.A.T.Y.)

३. प्रसिध्दी प्रमुख : गवळी मंगेश (B.A.T.Y.)

४. मांडणी : कदम सुलोचना (B.A.S.Y.)

५. सजावट : गुंडरे नेहा (B.A.T.Y.)

६. सदस्य : राठोड राहुल (B.A.F.Y.)

दरवर्षी भूगोल विभागातर्फे सर्व्हेक्षण, क्षेत्रभेटी भौगोलिक सहल, महत्वपूर्ण दिवस साजरे केले जातात. १४ जानेवारी हा दिवस 'भूगोल दिन' म्हणून साजरा करण्यात आला यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून  यांनी मार्गदर्शन केले तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार सर होते.

**वर्ग निहाय विद्यार्थी संख्या**

| अ.क्र. | वर्ग | मुले मुली | एकूण |
|---|---|---|---|
| १ | बी.ए. प्रथम वर्ष | १० १३ | २३ |
| २ | बी.ए. द्वितीय वर्ष | १४ १२ | २६ |
| ३ | बी.ए. तृतीय वर्ष | ०९ २४ | ३३ |

**प्रा. डॉ. दिगंबर माने**
भूगोल विभाग

# राष्ट्रीय सेवा योजना
# वार्षिक अहवाल सन २०१८-२०१९

आमच्या महाविद्यालयात रा.से.यो.चे १०० विद्यार्थ्यांचे एक युनिट (एकक) आहे. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये बी.ए. प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाची प्रवेश प्रक्रिया संपन्न झाल्यानंतर रा.से.यो. प्रवेश प्रक्रिया विद्यापीठाने ठरवून दिलेल्या कालावधीत पूर्ण करण्यात आली. शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीपासून रा.से.यो. विभागातर्फे विविध कार्यक्रमाचे आयोजन करुन रा.से.यो. संबंधी विद्यार्थ्यामध्ये पोषक वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला.

जून २०१८ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे आयोजित राज्यस्तरीय आव्हान शिबीरात आपल्या महाविद्यालयाचा विद्यार्थी विखील सुभाष विभुते यांने स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व केले. २१ जून हा दिवस क्रीडा विभागाच्या सहकार्याने आंतरराष्ट्रीय योग दिवस म्हणून साजरा करण्यात आला.

दि. १ जुलै २०१८ हा दिवस वसंतराव नाईक यांचा जन्मदिवस कृषीदिन म्हणून साजरा करण्यात आला तसेच १ जुलै ते १५ जुलै दरम्यान महाराष्ट्र शासनाद्वारा आयोजित महावृक्षारोपण अभियानाअंतर्गत महाविद्यालय परिसरात व महाविद्यालयाने दत्तक घेतलेल्या मौजे ब्रह्मपुरी गावात व तेथील स्मशान भूमीत वृक्षारोपण करण्यात आले.

१ जुलै ते ३१ जुलै २०१८ दरम्यान मतदार जनजागृती अभियान राबविण्यात आले. तसेच वर्षभर प्राचार्य डॉ. वसंत बिरादार, उपविभागीय अधिकारी मा. शुभांगी आंधळे, तहसिलदार मा. अरुणा संगेवार यांच्या मार्गदर्शनाखाली मतदार जागृती रॅली, नव मतदार नोंदणी, व्ही.व्ही. पॅट मशिन प्रात्यक्षिक आदी कार्यक्रम महाविद्यालयात व दत्तक गाव येथे आयोजित करण्यात आले.

नवी दिल्ली येथे होणाऱ्या राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन संचालनासाठी सूर्यवंशी नागेश व इप्पर दयानंद या विद्यार्थ्यांची लातूर जिल्ह्यातून निवड झाली. तसेच नेहरु युवा केंद्र द्वारा आयोजित स्वच्छता करंडक स्पर्धेत राठोड राहूल व नरवटे गणेश हे तालुकास्तरावर अनुक्रमे प्रथम व द्वितीय आले. लातूर येथे आयोजित दि. १ ते ५ मार्च दरम्यान जिल्हास्तरीय नेतृत्व शिबीरात विभुते विखील, नरवटे गणेश व रोडे नीलेश या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

दि. १५ ते २१ फेब्रुवारी २०१९ या दरम्यान मौजे ब्रह्मपुरी येथे विशेष निवासी शिबीर घेण्यात आले. या शिबीरामध्ये स्वच्छ भारत अभियान, हागणदारी मुक्त गाव, व्यसनमुक्ती, स्त्री आरोग्य तपासणी निदान व उपचार, पशुचिकित्सा या विशेष शिबीराबरोबरच ग्रापंचायत ब्रह्मपुरीच्या पाणी पुरवठा योजनेत पाईप लाईन खोदणे, नवीन पाईप लाईन टाकणे व पाण्याच्या टाकीचे बांधकाम यासाठी श्रमदान करण्यात आले.

याबरोबरच वर्षभर विविध महापुरुषांच्या जयंत्या व पुण्यतिथ्या, विविध सप्ताह, पंधरवाडा आदीचे आयोजन करण्यात आले. तसेच एन.एस.एस. नवप्रवेशित विद्यार्थी कार्यशाळा, एन.एस.एस. दिन,

एड्स दिन, जागतिक अपंग दिन, राष्ट्रीय मतदार दिन आदीचे औचित्य साधून विविध कार्यक्रम घेण्यात आले. याबरोबरच सामाजिक बांधिलकी जोपासत राष्ट्रीय मुल्यवर्धित शिक्षण देत पर्यावरण जनजागृती, मतदार जनजागृती, आरोग्य जनजागृती, आपत्ती व्यवस्थापन आदी कार्यात महाविद्यालय नेहमीच अग्रेसर असते. राष्ट्रीय आपत्तीमध्येही महाविद्यालयाने आपले योगदान दिले आहे. केरळमध्ये महापूर आल्यानंतर पूरग्रस्तांसाठी एन.एस.एस.च्या माध्यमातून रॅली काढून १७,५०० रुपयाचा निधी मा. प्राचार्य मार्फत शासनास सुपूर्द करण्यात आला.

विशेष म्हणजे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार सरांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाधिकारी डॉ. पांडुरंग चिलगर यांनी केलेल्या विशेष कार्याची दखल घेवून स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठाने उत्कृष्ठ कार्यक्रमाधिकारी पुरस्कार घोषित केला. डॉ. पांडुरंग चिलगर यांनी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये राज्यस्तरीय आव्हान निवड समितीवर, प्रजासत्ताक दिन संचलनासाठी जिल्हास्तरीय निवड समितीवर यशस्वी कार्य केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार सरांच्या मार्गदर्शनानुसार शैक्षणिक वर्ष २०१८-१९ ची एन.एस.एस.ची विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून कु. अजंली शेकडे ची निवड तसेच उत्कृष्ठ स्वंयसेवक म्हणून विखील विभुते ची निवड करण्यात आली.

अशा प्रकारे शैक्षणिक वर्ष २०१८-१९ या महाविद्यालयाच्या रा.से.यो. विभागाने राष्ट्रीय व सामाजिक उत्तरदायित्व लक्षात घेऊन पर्यावरण, आरोग्य आदि जनजागरण रॅलीसह परिसर व शहरातील सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता अभियान राबवून श्रमदानाचे कार्य 'नॉट मी बट यू' या ब्रीद वाक्यानुसार कार्य केले. तसेच रा.से.यो. च्या उद्दिष्टानुसार छोट्या मोठ्या अनेक उपक्रमात महाविद्यालयाचे रा.से.यो.चे. कार्य सुरळीतपणे सुरू आहे. हे कार्य सुरळीतपणे पार पाडण्यासाठी मा. विद्यापीठाचे रा.से.यो. कार्यक्रम समन्वयक डॉ. डी. डी. पवार, प्राचार्य डॉ. वसंत बिरादार, जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. संतोष पाटील, सल्लागार समितीचे सर्व पदाधिकारी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व रा.से.यो. सहकार्य महत्त्वपूर्ण आहेच. आपल्या सहकार्याशिवाय हे कार्य पूर्णत्वास जाऊ शकत नाही.

धन्यवाद !

**डॉ. पांडुरंग ज्ञानोबा चिलगर**
कार्यक्रमाधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना

# Department of Library
# Annual Report 2018-19

Library is a 'Heart' of the College. Teaching and learning system are supported II by library through reading material. College Central Library has established in 2000 for || students as well as for faculty members. Library is well prepared with reference books, textbooks, journals, periodicals and newspapers etc.

In this academic year 2018-19 library has taken a various orientation programme to the library users. This year we have arrange the programme of first year students i.e. welcomes to new admit first year students in the college. Library has celebrated birth If anniversary ofDr.S.R-Ranganathan. Also on the special vocation, we have arranged the ? books exhibition. "Library has organized the orientation to new users for use of library and library services; give the information about the library rules and regulations. This academic year library has purchased 213 books and 49 books are donated. Total collections of books are 8251. In this academic year 14 periodicals are subscribed for one year and seven newspapers are purchased for library. Also 203 users are using the library reading materials in this year. Library has launched last three years book bank scheme, scholar student card and demand on books these services are given by the library. Library is also started new "Wachan sanskrati samrudhi yojana". Library has giving Current awareness service, newspaper clipping service, and SMS alert service on what's up for primary using for only teachers.

Following services are provided by the library :

Reference services

Circulations.

User orientation and information literacy.

Reading room.

Newspaper clipping service.

Inter library loan.

Wachan sanskrati samrudhi yojana

Library staff:

Following library staff is available for the users.

Mr. Ingle P.M. (Librarian)

Mr. Malkapure W.K. (Lib. Attended)

Library advisory committee

Dr. Biradar V.M. {President}

Mr. Ingle P.M. {Secretary}

Dr. More. B.K. {Member}

Mr.Akade A.C. {Member}

Mr. Murmure A.S. {Member}

**Mr. Ingle P.M.**

Librarian

# क्रीडा विभाग
# वार्षिक अहवाल २०१८-१९

'ब' विभागीय मैदानी क्रीडास्पर्धेत

4 x 400 मी. रिले स्पर्धेत महाविद्यालयातील मुलींचा संघ तिसरा.

4 x 100 मीटर रिले स्पर्धेत महाविद्यालयाचा संघ तृतीय

शिवानंद डावरे हॅमर थ्रो मध्ये तृतीय. आंतर विद्यापीठ ऑल इंडिया स्पर्धेत महाविद्यालयीन सहभागी खेळाडू.

१) शुभम गुंजरगे ऑल इंडिया तलेवारबाजी स्पर्धेत अमृतसर येथे विद्यापीठ सघांत निवड.
२) कु. कुसुम देमगुंडे ऑल इंडिया तलवार बाजी स्पर्धेत अमृतसर येथे विद्यापीठ संघात निवड.
३) कु. वैष्णवी भुतके ऑल इंडिया तलवारबाजी स्पर्धेत अमृतसर येथे विद्यापीठ संघात निवड.
४) कु. प्रियंका सोनकांबळे ऑल इंडिया तलवार बाजी स्पर्धेत विद्यापीठ संघात निवड.
५) शुभम गुंजरगे ऑल इंडिया नेटबॉल स्पर्धेत चेन्नई येथे विद्यापीठ संघात निवड.
६) दत्तात्रय देवकते ऑल इंडिया नेटबॉल स्पर्धेत चेन्नई येथे विद्यापीठ संघात निवड.
७) 'ब' झोन तलवारबाजी स्पर्धेच्या मुले / मुलीचा सराव शिबीर महाविद्यालयात संपन्न.
८) विद्यापीठाचा नेटबॉल क्रीडा प्रकाराचा आंतर विद्यापीठ नेटबॉल संघाचे सराव शिबीर महाविद्यालयात संपन्न.
९) 'ध्यानचंद' भित्तीपत्रकाचे ६ भित्तीपत्रक प्रकाशित.

**डॉ. अभिजीत एस. मोरे**
क्रीडा विभाग

# गांधी विचार संस्कार परीक्षा
# २०१८-२०१९

शैक्षणिक वर्ष २०१३-२०१४ पासून दरवर्षी आमच्या महाविद्यालयामध्ये गांधी रिचर्स फाऊंडेशन जळगावच्या गांधी विचार संस्कार परीक्षेचे आयोजन केले जाते. विद्यार्थ्यांच्या मनामध्ये गांधीजीचे विचार रुजविण्याचा उदात्त ध्येयाने प्रेरीत होऊन ही परीक्षा घेतली जाते.

शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९ मध्ये आमच्या महाविद्यालयातील बी.ए. प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षातील एकूण ३३ विद्यार्थी बसले होते. तसेच इयत्ता ५ वी मधून १ विद्यार्थीनी व इयत्ता १२ मधून एक विद्यार्थी या गांधी विचार संस्कार परीक्षेस बसले होते. एकूण ३५ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्त साधून २१ आक्टोबर २०१८ रोजी ही परीक्षा घेण्यात आली होती. या परीक्षेमध्ये इयत्ता १२ वी मधून बिरादार आविष्कार वसंतराव हा लातूर जिल्हयामध्ये गुणानुक्रम सर्वप्रथम आला. तसेच बी.ए. प्रथम वर्षाची कु.राठोड दर्शना संतोष ही विद्यार्थीनी लातूर जिल्हयातून गुणानुक्रमे सर्वप्रथम आली. त्यांच्या या यशाबदल प्रमाणपत्र व सुवर्णपदक देऊन महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ.वसंत बिरादार यांच्या हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला. तसेच परीक्षा समन्वयक म्हणून प्रा.डॉ.एन.यु.मुळे यांना प्रशस्तीपत्र व महाविद्यालयाला सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात आले.

गांधी विचार संस्कार परीक्षेचे वैशिष्ट्ये असे की, यामध्ये मुलींची संख्या अधिक होती.

'अहिंसो परमो धर्म' - महात्मा गांधी

**प्रा.डॉ.एन.यु.मुळे**
समन्वयक, गांधी विचार संस्कार परीक्षा
महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
# अभ्यास केंद्र

'ज्ञानगंगा घरोघरी' हे ब्रीदवाक्य घेवून महाराष्ट्रातील घराघरात पोहचलेल्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे अभ्यास केंद्र सन २०११-२०१२ पासून या महाविद्यालयात कार्यरत आहे. अल्पकाळामध्ये अनेक विद्यार्थ्यांनी अभ्यासकेंद्रात प्रवेश घेतलेला आहे.

- मुक्त विद्यापीठाच्या अभ्यासकेंद्रात पूर्वतयारी, बी. ए. प्रथम, द्वितीय, तृतीय वर्गाचे अभ्यासक्रम चालू आहेत.
- शैक्षणिक वर्ष २०१५-२०१६ पासून एम. ए. (मराठी) अभ्यासक्रम सुरु झालेला आहे.
- शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९ मध्ये जवळपास ५५२ इतक्या विद्यार्थ्यांनी आमच्या अभ्यासकेंद्रात प्रवेश घेतलेला आहे.
- पूर्वतयारी वर्गातून प्रवेश घेतलेल्या बहुसंख्य् विद्यार्थ्यांना पदवी शिक्षणातून नौकरीची संधी प्राप्त झाली आहे.
- पदवी वर्गात मराठी, हिंदी, इंग्रजी, इतिहास, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, विषय शिकण्याची सोय आहे.
- प्रत्येक विद्यार्थ्यांना वैयक्तिक लक्ष देऊन मार्गदर्शन केले जाते.

केंद्र संयोजक :

**प्रा. डॉ. अनिल मुंढे**

व

केंद्र सहाय्यक :

**प्रा. डॉ. संतोष पाटील**

# स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र
# वार्षिक अहवाल २०१८-२०१९

महाराष्ट्र प्रशासन सेवा व भारतीय प्रशासन सेवेत महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवावा. यासाठी महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र कार्यरत आहे. तळागाळातील मजुरांची व शेतकऱ्यांची मुले राजपत्रित अधिकारी व्हावेत, म्हणून प्राचार्य डॉ. वसंत बिरादार यांच्या मार्गदर्शनाखाली हा विभाग वाटचाल करीत आहे.

दिनांक १४/०८/२०१८ रोजी ज्ञानदीप स्पर्धा परीक्षा अकॅडमी, अहमदपूरचे संचालक श्री उध्दव इप्पर व प्रा. आनंद गोणे यांच्या प्रमुख उपस्थितीत व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांच्या अध्यक्षतेखाली स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्राचे उद्घाटन करण्यात आले.

दिनांक २२/०९/२०१८ रोजी ज्ञानदीप स्पर्धा परीक्षा अकॅडमीचे प्रा. आनंद गोणे यांनी इतिहास विषयावर स्पर्धा परीक्षा केंद्रातर्फे आयोजित विशेष व्याख्यानात मार्गदर्शन केले आणि विद्यार्थ्यांना एम.पी.एस.सी. व यु.पी. एस.सी परीक्षेची माहिती दिली.

दिनांक ०७/०९/२०१८ पासून स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातर्फे दर शुक्रवारी व शनिवारी दुपारी ३.०५ ते ३.५५ दरम्यान हॉल क्र. १५ मध्ये तासिका सर्व प्राध्यापकांनी घेण्यास सुरुवात केली.

आमच्या महाविद्यालयातील जास्तीत जास्त प्राध्यापक S.E.T. व N.E.T. परिक्षा उत्तीर्ण असून Ph.D. प्राप्त केलेले आहेत. कठोर मेहनत करुन सर्व प्राध्यापक स्पर्धा परीक्षा केंद्राच्या मोफत तासिका घेतात. व विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा देण्यासाठी प्रेरीत करतात.

स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातर्फे प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना कोचिंग केल्यानंतर वर्षाच्या शेवटी फेब्रुवारी महिन्यात M.P.S.C. च्या धर्तीवर परीक्षा घेण्यात आली. कॉलेज आयडॉल परिक्षेत मराठी, हिंदी, इंग्रजी, संस्कृत, इतिहास, भूगोल, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, क्रीडा व चालू घडामोडी इत्यादी. विषयावरील प्रश्न विचारुन या परिक्षेत सर्वोच्च मार्क घेणारा विद्यार्थी कॉलेज आयडॉल म्हणून घोषित केला जातो.

या शैक्षणिक वर्षात बी.ए. तृतीय वर्षातील कु. कदम सुलोचना ज्ञानोबा या गुणवान विद्यार्थीनीने कॉलेज आयडॉल पद पटकाविले. या विद्यार्थीनीचा वार्षिक स्नेह संमेलनात प्रमाणपत्र मोमेंटो शाल व पुष्पहार देवून प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांनी सत्कार केला.

यावर्षी दिनांक १८/०८/२०१८ रोजी ज्ञानदीप स्पर्धा परीक्षा अकॅडमी अहमदपूर व स्पर्धा परीक्षा केंद्र, महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर यांच्यात M.P.S.C. व U.P.S.C. परिक्षेसाठी विद्यार्थाना मार्गदर्शन करण्यासाठी कोलॅबरेशन करण्यात आले. व विविध उपक्रम राबविण्यात आले. आमच्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रात अभ्यास केलेले विद्यार्थी महाराष्ट्र शासनात विविध विभागात कार्यरत आहेत.

**डॉ. बब्रुवान मोरे**
संचालक
स्पर्धा परीक्षा विभाग

# सांस्कृतिक विभाग
# वार्षिक अहवाल २०१८-२०१९

महात्मा फुले महाविद्यालयातील सांस्कृतिक विभाग हा अत्यंत महत्त्वपूर्ण असा विभाग आहे. या विभागातर्फे २०१८-२०१९ या शैक्षणिक वर्षात विविध उपक्रम राबवून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी अनेक कार्यक्रम घेण्यात आले. ते पुढीलप्रमाणे आहेत.

१. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या सहयोग २०१८ युवक महोत्सवात सहभाग: स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड आणि सहयोग सेवाभावी संस्थेचे इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसी, विष्णूपूरी येथे घेण्यात आलेल्या सहयोग २०१८ युवक महोत्सवात महात्मा फुले महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी वक्तृत्व, वादविवाद, मुकाभिनय, विडंबन, कोलाज, एकपात्री प्रयोग, रांगोळी इत्यादी स्पर्धामध्ये दमदार भाग नोंदवून प्रबोधनात्मक कार्य केले.

२. नेहरु युवा केंद्र अहमदपूरच्या वतीने आयोजित वक्तृत्त्व स्पर्धेत अहमदपूर तालुक्यातून प्रथम पुरस्कार मान राठोड राहूल साहेबराव याला व द्वितीय पुरस्कार नरवटे गणेश मोहनराव या विद्यार्थ्याला मिळाला. या दोनही विद्यार्थ्यांनी आपल्या वक्तृत्त्वाची छाप निर्माण करुन महाविद्यालयाला लौकिक प्राप्त करुन दिला.

३. नेहरु युवा केंद्र लातूरतर्फे आयोजित वक्तृत्व स्पर्धेत अहमदपूर तालुक्यातर्फे राठोड राहुल साहेबराव व नरवटे गणेश मोहनराव या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला व जिल्हा स्तरीय सहभाग नोंदविला. व जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत आपली छाप पाडली.

४. विविध जयंत्या व पुण्यतिथ्यांचे आयोजन : फुले महाविद्यालयात सांस्कृतिक विभागातर्फे विविध जयंत्या व स्मृती दिनाचे आयोजन केले जाते. मा. प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महात्मा फुले परिवारातर्फे अहमदपूर शहरात शोभायात्रा काढून शिवजयंती साजरी करण्यात आली. या शिवजयंती महोत्सवात सामाजिक सांस्कृतिक प्रबोधन करण्यात आले. महात्मा फुले जयंती, महात्मा स्मृतीदिन, छत्रपती संभाजी महाराज बलिदान दिन, शहीद दिन, महात्मा गांधी जयंती, डॉ. आंबेडकर जयंती, बिरसा मुंडा जयंती, स्वामी विवेकानंद जयंती, राजमाता जिजाऊ व सावित्रीबाई फुले जयंती, शहाजी राजे जयंती, आण्णाभाऊ साठे जयंती, लालबहादूर शास्त्री जयंती, अशा अनेक

जयंत्या व पुण्यतिथी यांचे आयोजन सांस्कृतिक विभागातर्फे होते.

५. पुरस्कार प्राप्त गुणवंत माजी विद्यार्थ्यांचा सत्कार : महाविद्यालयातील पुरस्कार प्राप्त गुणवंत माजी विद्यार्थ्यांचा सत्कार मा. प्राचार्याच्या हस्ते करण्यात आला. या वर्षी नांदेड येथील श्रीमती शेख शकीला यांचा आदर्श शिस्तीची शिक्षिका म्हणून पुरस्कार मिळाल्याबददल व अहमदपूर येथील श्रीमती वर्षा माळी यांना महात्मा फुले राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्याबददल प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. विशेष् म्हणजे या सत्कार कार्यक्रमाला अनेक माजी विद्यार्थी उपस्थित होते.

६. विविध कार्यक्रमाचे आयोजन : बी.ए. प्रथम वर्ष विद्यार्थ्याचा स्वागत कार्यक्रम, बी.ए. तृतीय वर्ष विद्यार्थ्यांना निरोप समारंभ कार्यक्रम घेण्यात आले. याबरोबरच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी वाद–विवाद स्पर्धा, निबंध लेखन, वक्तृत्त्व स्पर्धा, आयत्यावेळचे भाषण, रांगोळी स्पर्धा, इत्यादी कार्यक्रम आयोजित करण्यात आले. व पुरस्कार प्राप्त विद्यार्थ्यांना वार्षिक स्नेह संमेलनात प्रमाणपत्र मा. प्राचार्य व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते वितरीत करण्यात आले.

७. वार्षिक स्नेह संमेलनाचे आयोजन : महाविद्यालयात भव्यदिव्य स्वरुपाच्या वार्षिक स्नेह संम्मेलनाचे आयोजन सांस्कृतिक विभागातर्फे करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना वाव देण्याचे कार्य वार्षिक स्नेह संमेलनाच्या माध्यमातून होते. प्रमुख पाहुण्यांच्या मार्गदर्शनाबरोबरच सांस्कृतिक विविध गुण दर्शनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. विद्यार्थ्यांनी गीत गायन, नृत्य, यामध्ये सहभाग नोंदविला. वार्षिक स्नेह संमेलनात विविध कार्यक्रमाबरोबर स्वादिष्ट अशा मिष्टान्न भोजनाची सोय विद्यार्थ्यासाठी असते हे आमच्या महाविद्यालयाचे वेगळे वैशिष्टये होय.

**डॉ. बब्रुवान मोरे**
संचालक,
सांस्कृतिक विभाग